महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
- इलेक्ट्रिकल सुपरवायझर
- इलेक्ट्रिकल वायरमन
- टू-व्हीलर मेकॅनिक
- A.C. मेकॅनिक
- कॉम्प्युटर ऑपरेटर
- ॲटोमोबाईल टेक्निशियन
- मोटार वायडिंग
- फोर व्हीलर मेकॅनिक
- वेल्डर / प्लंबर
- कॉम्प्युटर हार्डवेअर

एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १०९ वा | मंगळवार, दि.२५ नोव्हेंबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# लोकसभा आणि विधानसभेला झालेली चूक नगर परिषदेला सुधारून घेण्याची शहरवासीयांना चांगली संधी

## विरोधकांच्या भावनिक मुद्द्यांना बळी न पडता भाजपच्या व्हिजन सोबत आल्यास पुढील तीस वर्षाचा विकास कायापालट शक्य

## भाजपाच्या अल्पसंख्याक मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मुजीबभाई मुजावर यांचे महत्त्वपूर्ण मत

## मोहोळ मध्ये नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शितल क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ संवाद दौऱ्या दरम्यान व्यक्त केले मत

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ शहर हे गेल्या दहा वर्षापासून विरोधी पक्षनेत्यांच्या भावनिक राजकारणाचे सॉफ्ट टार्गेट होताना दिसत आहे. लोकसभा निवडणुकीत भरभरून मतदान घेऊन देखील लोकप्रतिनिधींनी मोहोळचे रस्ते,पाणी आरोग्यविषयक प्रश्न सोडवण्याबाबत उदासीनता दाखवली. विधानसभेचा निकाल होऊन वर्षाची कालावधी लोटला तरी आपल्या मोहोळ शहरात विशेष निधीची गोष्ट तर सोडाच मात्र विधानसभेच्या निधीच्या माध्यमातून दहा नारळ देखील विकासकामांचे या शहरात फुटू शकले नाहीत ही निश्चितपणे दुर्दैवी बाब आहे. त्यामुळे आपण चालू विकासाला खिळ घालून हे काय करून बसलो ? याचा खऱ्या अर्थाने पश्चाताप सर्वसामान्यांना होताना दिसत आहे. आता ही चूक सुधारायची असेल तर मोहोळ शहरातील सर्वसामान्य जनतेने भारतीय जनता पक्षाचे लोकनियुक्त नगराध्यक्ष पदाचे अधिकृत उमेदवार शितल सुशील क्षीरसागर आणि



अन्य सर्व प्रभागातील अधिकृत उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करत मोहोळ शहराच्या सर्वांगीण विकासाचा ठाम आणि धोरणात्मक निर्णय घ्यावा असे आवाहन भाजपच्या अल्पसंख्याक मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मुजीबभाई मुजावर मोहोळ शहरातील प्रचार सभा दरम्यान केले.

भारतीय जनता पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार शितल क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ प्रभाग भेटीनंतर माध्यमांशी बोलताना मुजीबभाई मुजावर यांनी अनेक महत्त्वपूर्ण मुद्दे मांडत विरोधकांच्या भावनिक राजकारणामुळे तसेच सत्ताधारी पक्षाच्या विरोधातील चुकीच्या पद्धतीचा नाहक आकस आणि इर्षेच्या राजकारणामुळे मोहोळ शहराची कशी वाताहत आणि ससेहोलपट होतेय याबाबत महत्वपूर्ण बाबी मांडल्या.

भाजपाची सत्ता आल्यानंतर शहराच्या विकासाच्या पदरात भरीव निधीचे माप कसे पडू शकते

मोहोळ नगर परिषदेच्या निवडणुकीमध्ये सर्व मुद्दे बाजूला पडत आता मोहोळ शहराच्या सर्वांगीण हितासाठी राज्य शासनाकडून भरीव निधी कोणता पक्ष आणू शकतो ? तर याचे उत्तर भारतीय जनता पार्टी हेच असल्यामुळे सर्वांचे लक्ष भारतीय जनता पार्टीच्या या निवडणुकीतील यशाकडे लागले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री जयकुमारभाऊ गोरे, ज्येष्ठ नेते राजन पाटील, जिल्हाध्यक्ष शशिकांत नाना चव्हाण यांच्यासारखी भक्कम पाठबळाची किनार लाभल्यामुळे भाजपाचे विकासाचे मुद्दे शहरवासीयांना पटू लागले आहेत. त्यामुळे नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शीतल क्षीरसागर यांना सर्वाधिक पसंती मिळत आहे.गेल्या दहा वर्षाच्या मोहोळ तालुक्याच्या राजकीय चढउतारामध्ये शहरातील मतदारांनी विरोधी पक्ष इषेपीटी घेतलेल्या निर्णयामुळे याचा मोहोळ शहराच्या राजकारणाला फायदा कमी आणि तोटाच जास्त झाला. लोकसभेला भावनिक मुद्द्यावर भरकटून मताधिक्य दिले निधी मात्र मोहोळ तालुक्याला आणि शहराला अगदी तुटपुंजा मिळाला. या बाबी आता उशिरा का होईना शेरवास यांच्या लक्षात येत आहेत त्यामुळे भाजपाच्या उमेदवारांना प्रचारा दरम्यान पाठिंबा वाढताना दिसत आहे.

– **सुशील क्षीरसागर,** निवडणूक प्रभारी भाजपा

मोहोळ शहराला लोकसंख्येच्या प्रमाणात पाणीपुरवठा होण्यासाठी मोठ्या पाणीपुरवठा योजना त्याचबरोबर मोहोळ शहर परिसरात औद्योगिक वसाहतीची निर्मिती झाल्यास सुशिक्षित बेरोजगारांच्या हाताला काम मिळेल. मोहोळ येथे कृषी विद्यापीठाच्या मालकीची शेकडो एकर जमीन उपलब्ध आहे. त्या ठिकाणी शासकीय कृषी महाविद्यालय सुरू केल्यास त्याचा मोठा फायदा कष्टकरी शेतकऱ्यांच्या मुलांना कृषी तंत्रज्ञान शिकण्यासाठी होईल. या सर्व धोरणात्मक बाबी कायमस्वरूपी सोडवण्यासाठी केंद्रात राज्यात कार्यरत असलेल्या भाजपाची सत्ता मोहोळ नगर परिषदेत येणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. तुम्ही एकदा भाजपाला संधी द्या पुढील पंचवीस वर्षाच्या मोहोळ शहराच्या सर्वांगीण विकास विकासाचा रोड मॅप भाजपा करून दाखवेल असेही यावेळी ते म्हणाले. आज राज्यात भाजपाच्या ताब्यात असलेल्या महानगरपालिका आणि नगरपरिषदांमध्ये जाऊन तेथील विकासकामांची आणि यशस्वी वाटचालीची सद्यस्थिती पहा तेव्हा आपण कुठे आहोत आणि जग कुठे आहे याची खात्री होईल.

– **मुजीबभाई मुजावर,**
जिल्हाध्यक्ष भाजपा अल्पसंख्याक मोर्चा

याचा सविस्तर विवेचनही यावेळी त्यांनी केले. भाजपाच्या पक्षश्रेष्ठींनी सारासार विचार करत एका सुशिक्षित आणि युवा उमेदवाराची नगराध्यक्ष पदाच्या लोकनियुक्त उमेदवारीसाठी निवड केल्यामुळे मतदारांनी भावनिक मुद्द्यांना बळी न पडता व्हिजन घेऊन पुढे जाणाऱ्या भाजपाला मोठ्या मताधिक्याने विजयी करत मोहोळ शहराच्या भविष्यातील सर्वांगीण विकासाचे साक्षीदार व्हावे असेही महत्त्वपूर्ण आवाहन यावेळी मुजीबभाई मुजावर यांनी केले. याप्रसंगी भाजपाचे सर्व उमेदवार आणि पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# यापुढील काळात मोहोळ शहराला विकासाचे मॉडेल बनवण्यासाठी भाजपा हाच सक्षम आणि सर्वोत्तम पर्याय

## नगराध्यक्षपदाच्या उमेदवार शीतल क्षीरसागर यांच्यासह भाजपाच्या सर्व उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा

### मोहोळ शहराचे नूतन भाजप नेते बाळासाहेब गायकवाड यांचे प्रचार यात्रे दरम्यान आवाहन

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** भारतीय जनता पार्टीने लोकनियुक्त नगराध्यक्ष पदासाठी दिलेल्या उमेदवार शितल सुशील क्षीरसागर या व त्यांच्यासोबतचे वीस नगरसेवकाचे सर्व उमेदवार हे सातत्याने सामाजिक कामात अग्रेसर असणारे आहेत. त्यामुळे मोहोळ शहराला जर विकासाचा मॉडेल बनवायचं असेल तर केंद्रात पंतप्रधान ना.नरेंद्र मोदी व राज्यात मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात पालकमंत्री ना.जयकुमार गोरे हे निधीची कमतरता भासू देणार नाहीत.त्यामुळे मोहोळ हे विकासाचे मॉडेल होणार हा माझा ठाम विश्वास आहे.आणी त्या मुळेच मी शिवसेना ( उबाठा ) सोडून भारतीय जनता पक्षात प्रवेश केलेला आहे. असे सांगत मोहोळ शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मोहोळकरांनी भाजपाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे असे आवाहन पंचायत समितीचे माजी उपसभापती बाळासाहेब



मोहोळ शहराला विकासाचे मॉडेल बनवण्याची क्षमता फक्त भारतीय जनता पक्षातच आहे. कारण हा पक्ष विकासाचे व्हिजन घेऊन देशामध्ये व राज्यांमध्ये मोठी प्रगती करत आहे. 'सबका साथ सबका विकास' या धोरणानुसार भाजपाने देशात व राज्यात विकासाची मोठी क्रांती केलेली आहे. या क्रांतीत सामील होऊन मोहोळ शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी केंद्रात व राज्यात मजबूत सत्ता असणाऱ्या भाजपाच्या पाठीशीच मोहोळकरांनी उभे राहावे.

– **बाळासाहेब गायकवाड,** नुतन भाजप नेते मोहोळ शहर

गायकवाड यांनी व्यक्त केले.

सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. जयकुमार गोरे , माजी आमदार राजन पाटील जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण तसेच भाजपा ज्येष्ठ नेते नागनाथ क्षीरसागर यांच्या प्रमुख उपस्थितीत माजी उपसभापती बाळासाहेब गायकवाड यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातून भारतीय जनता पार्टीत पक्ष प्रवेश केल्यानंतर प्रथमच ते भारतीय जनता पार्टीच्या लोकनियुक्त नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार शितल सुशील क्षीरसागर यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे सर्वच अधिकृत उमेदवार यांच्या प्रचारादरम्यान मोहोळ शहरांमध्ये होम टू होम प्रचार करीत असताना त्यांनी हे मत व्यक्त केले.

या होम टू होम प्रचारा प्रसंगी लोकनियुक्त नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शीतल सुशील क्षीरसागर प्रभाग ९ चे भाजपा उमेदवार नीलावती द्रोणाचार्य डोके, संतोष वायचळ, वैभव गुंड, प्रभाकर डोके, नाना डोके, कबीर कोरबु, विष्णुपंत गायकवाड, अनुसूचित जाती मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष संजव खिलारे, राज्य परिषद सदस्या विजया वडेपल्ली,संगीता खंदारे, माजी नगरसेविका अर्चना संतोष वायचळ, मुजीब मुजावर, नवनाथ गाढवे, छगनआष्टूळ आदी होते.

# गतवेळी निसटत्या मताने ताब्यातुन गेलेल्या प्रभाग क्र. 10 मध्ये भगवा फडकविण्यासाठी शिंदे सेनेचे शिवसैनिक लागले कामाला



## स्वत: पद्माकर आप्पा देशमुख यांनी प्रचाराची सुत्रे हाती घेतल्याने सर्वपक्षीय उमेदवारांना फुटतोय घाम

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** प्रभाग दहा मधील राजकीय घडामोडीमध्ये सर्वात मोठा ट्विस्ट आला तो शिवसेनेचे जेष्ठ नेते तथा मोहोळ शहराचे राजकीय आधारवड पद्माकर आप्पा देशमुख यांचे सुपुत्र असलेले चैतन्यबापु देशमुख यांच्या उमेदवारीमुळे.

मोहोळ शहराच्या राजकीय क्षेत्रात रहिवासी जरी पुर्व भागाचे असले तरी चारही दिशेला चाणाक्ष रणनितीच्या माध्यमातून आपल्या कौशल्याचा प्रभाव सर्वदुर पसरविणारे पद्माकर आप्पा देशमुख यांनी परिवारातील सदस्याला उमेदवारी घेत शहराच्या राजकरणातील आव्हान कायम ठेवले आहे. प्रभाग दहा मध्ये वास्तव्यास असलेल्या आप्पांचे सुपुत्र चैतन्यबापु देशमुख यांच्या उमेदवारीमुळे सुरूवातील एकेरी वाटणारी भाजपविरोधातील लढाई तीव्र झाली. उमेदवारी मिळवून अर्ज दाखल करताच चैतन्यबापु देशमुख आणि प्रसाद देशमुख या बंधुंनी आवश्यक त्या ठिकाणी मतदार बंधु-भगिनींनी सुचविलेल्या उपाययोजना त्वरीत पुर्ण करण्यावर भर दिला आहे. त्यामुळे त्यांच्या कामाबद्दलची सकारत्मकता मोठया प्रमाणात वाढली आहे. चैतन्यबापु देशमुख हे या प्रभागातील युवा उमेदवार असल्यामुळे साहजिकच त्यांच्या सोबत युवकांचा मोठा संच प्रचारात उतरला आहे. चैतन्यबापु देशमुख यांच्या विजयासाठी पद्माकर आप्पा देशमुख यांना आमदार राजु खरे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख चरणराज चवरे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष उमेशदादा पाटील, शिवसेनेचे ओबीसी विभागाचे राज्याचे नेते तथा प्रथम नगराध्यक्ष रमेश बारसकर या मान्यवर नेतेमंडळींची मोठी साथ मिळत आहे.

चैतन्यबापु देशमुख यांच्या प्रचारार्थ संपुर्ण देशमुख परिवार प्रभागात सक्रीय झाला आहे. या प्रभागातील मराठा, धनगर आणि मुस्लिम मतदारांची भुमिका नक्कीच निर्णायक असल्यामुळे स्वतः पद्माकर आप्पा देशमुख यांनी या प्रभागातील प्रमुख मार्गदर्शकांची बैठक बोलावून त्यांना सहकार्याचे आवाहन करत विजयाचा कानमंत्र दिला आहे. गतवेळी निसटत्या मताने भाजपने ताब्यात घेतलेला हा प्रभाग शिवसेना शिंदे पक्षाच्या ताब्यात घेण्यासाठी पद्माकर आप्पा देशमुख आणि देशमुख परिवाराने पुर्ण क्षमतेने शिव-धनुष्य ताणल्याचे जाणवत आहे.

# बारसकरासह संपूर्ण शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवारांनी होम-टू-होम प्रचारात घेतली आघाडी






**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना सुरुवात झाल्यानंतर मोहोळ शहरातील राजकीय वातावरण अक्षरशः तापले आहे. गेल्या 35 ते 40 वर्षापासून मोहोळ नगरपरिषदेवर वर्चस्व गाजवणाऱ्या भाजपसमोर शिवसेना शिंदे गटाने भक्कम आणि सुसंघटित लढत उभारल्याने या निवडणुकीचे समीकरण पूर्णपणे बदलले आहे. या राजकीय लढतीचा केंद्रबिंदू ठरले आहेत, मोहोळचे शिवसेना नेते, पॅनल प्रमुख व माजी नगराध्यक्ष रमेश बारसकर.

अडीच वर्षाच्या अल्प कार्यकाळातही कठीण परिस्थितीतून मोहोळ शहराला दजेर्दार विकासाची नवी दिशा देणारे रमेश बारसकर यांनी पुन्हा एकदा मोहोळकरांच्या अपेक्षांचे अधिष्ठान बनले आहे. त्यांच्या कार्यकाळात झालेल्या मुख्य रस्त्यासह इतर विकासकामांचा प्रभाव आजही शहर अनुभवत आहे. बारसकरांची विकासाची परंपरा, मोहोळकरांच्या मनातील आशेचा किरण. या पार्श्वभूमीवर शिंदे गटाच्या पॅनलच्या प्रचाराचा मोठा शुभारंभ नुकताच मोहोळमध्ये पार पडला. या सभेला महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे विशेष उपस्थित होते आणि त्यांच्या सभेतील उपस्थितीने संपूर्ण मोहोळमध्ये ऊर्जा, उत्साह आणि विजयी लाटेचे संकेत निर्माण झाले.

सभेत बोलताना शिंदे यांनी मोहोळकरांना ठाम आश्वासन दिले, 'मोहोळ शहराचा विकास कोणत्याही परिस्थितीत मागे राहू देणार नाही. निधी, योजना आणि शासकीय मदतीची कमतरता कधीच भासणार नाही. संपूर्ण शिंदे गट मोहोळच्या पाठीशी आहे.' 'मोहोळचा विकास रोखणार नाही.' त्यांच्या या शब्दांनी गेल्या 30 वर्षांत राजकीय अडथळ्यांमुळे रखडलेल्या विकासाला आता गती मिळणार, असा विश्वास सर्वसामान्यांच्या मनात निर्माण झाला.

रमेश बारसकर यांनी सभेत प्रस्थापित नेतृत्वावर थेट आरोपांचा मारा केला. ते म्हणाले, 'आजपर्यंत प्रशासक आणि मुख्याधिकाऱ्यांना हाताशी धरून मोहोळच्या मुख्य रस्त्यासाठी एक रुपयाही मिळू दिला नाही. विकासकामांना जाणीवपूर्वक अडथळे आणले. पण जनता सर्व पाहत आहे.' त्यांच्या या आरोपांना नागरिकांनीही जोरदार दाद दिली. कारण बारसकरांच्या कार्यकाळातील प्रत्यक्ष कामांची साक्ष मोहोळ आजही देते. हे वास्तव नागरिकांमध्ये ठाममताने व्यक्त झाले.

शिंदे गटाच्या उमेदवारांनी घराघरात जाऊन मतदारांशी थेट संवाद साधणारी होम-टू-होम मोहीम सुरू केली असून प्रत्येक प्रभागात या मोहिमेला उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. बारसकर स्वतः या मोहिमेत आघाडीवर असून जाहीरनाम्याची माहिती, विकासाचा आराखडा व भविष्यातील दिशा स्पष्ट करण्याचा प्रयत्न नागरिकांना भावतो आहे. त्यामुळे धनुष्यबाणाचे चिन्ह मोहोळकरांच्या मनात स्थिरावताना दिसत आहे.

राजकीय समीकरणे, नागरिकांचा प्रतिसाद, निधीची आश्वासने आणि पॅनलप्रमुख म्हणून बारसकरांचा विकासाचा ट्रॅकरेकॉर्ड पाहता मोहोळमधील वातावरण शिवसेना शिंदे गटाच्या बाजूने झुकले असल्याची चर्चा जोमात आहे. मोहोळमध्ये एकच चर्चा : 'नगरपरिषद भगव्या झेंड्याकडे.'

सर्व प्रभागांतून शिंदे गटाचे उमेदवारांनी प्रचारात आघाडी घेतल्याचे दिसून येते आहे. धनुष्यबाणाचे चिन्ह शहरभर लोकप्रिय झाल्याने शिवसेनेच्या पॅनलाला परिवर्तनाच्या नव्या पहाटेची चाहूल लागली आहे.

मोहोळमधील बदलत्या राजकीय वाऱ्यांमुळे आगामी नगरपरिषद निवडणूक ही केवळ सत्ता हस्तांतरणाची नव्हे, तर शहराच्या संपूर्ण विकासपवाची सुरुवात ठरणार असल्याचे नागरिकांचे स्पष्ट मत आहे.

उपमुख्यमंत्री शिंदे यांचे समर्थन, बारसकरांचे नेतृत्व आणि नागरिकांची उभारी या तिन्हींच्या संगमामुळे मोहोळ शहरात परिवर्तनाची नवी पहाट उगवण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

# पक्षश्रेष्ठींचा आधार आणि प्रभागातील मायबाप जनतेचे आशीर्वाद माझ्या पाठीशी असल्याने माझा विजय निश्चित

## प्रभाग क्र. चार चे भाजपा उमेदवार दत्तात्रय खवळे यांचा ठाम विश्वास



## टीका टिपणी करण्यापेक्षा प्रभागाला कोट्यावधी रुपयांचा निधी खेचून आणल्याचे कृतार्थ समाधान

**मोहोळ (साहिल शेख):-** प्रभाग क्रमांक चार मधून भारतीय जनता पक्षाचे अनुसूचित जाती प्रवर्गातील अधिकृत उमेदवार दत्तात्रय खवळे यांच्या प्रचाराचा झंझावत काही केल्या कमी होत नसल्यामुळे विरोधकांना आता टीका करण्यासाठी नवे मुद्दे शोधावे लागत आहेत. काहीही झालं तरी या प्रभागात दत्तात्रय खवळे यांच्याच विकास कामांचा बोलबाला झाल्यामुळे या प्रभागातील लढत ही आता भाजपाच्या

राजकारण करणे म्हणजे टीकाटिपणी करणे कोणाचा द्वेष करणे हे माझ्या स्वभावात बसत नाही. तर राजकारण करणे म्हणजे माझ्या प्रभागातील गोरगरीब आणि सर्वसामान्य जनतेसाठी चांगल्या दर्जाचे रस्ते, पाणी, वीज आणि आरोग्यविषयक सुविधा पुरवण्यासाठी दक्ष राहणे हेच माझे तत्व आहे. आज मी जे काही राजकीय क्षेत्रात यश मिळवले आहे त्यामध्ये माझे नेते माजी आमदार राजन पाटील तसेच माझ्या प्रभागातील गोरगरीब मायबाप जनतेचा आशीर्वाद असून ही शक्ती माझ्या पाठीशी असल्यावर कोणतीही अदृश्य शक्ती माझे राजकीय भवितव्य अडचणीत आणू शकत नाही असा मला विश्वास आहे. त्यामुळे आजवर प्रभागासाठी झटत आलोय आणि यापुढेही माझ्या प्रभागासाठीच झटत राहणार निस्वार्थी भाऊनेने आणि प्रामाणिक धोरणाने राजकारण केल्यावर यश मिळतेच असा मला ठाम विश्वास आहे.

– **दत्तात्रयअण्णा खवळे,** भावी नगरसेवक

पारड्यात जात असल्याचे दिसत आहे. विशेष म्हणजे दत्तात्रय खवळे यांनी केलेल्या प्रभागाचा सर्वांगीण विकास हा गेल्या दहा वर्षापासून प्रत्येकाच्या डोळ्यासमोर झाल्यामुळे ते खऱ्या अर्थाने या प्रभागाचे सर्वेसर्वा आणि विकासपुरुष ठरले आहेत.

ज्येष्ठ नेते राजन पाटील यांनी टाकलेला विश्वास सार्थ ठरवत माजी आमदार यशवंत माने यांच्याकडे अविरतपणे पाठपुरावा करत माझ्या प्रभागासाठी हे काम घ्या, माझ्या प्रभागातील सर्वसामान्यांसाठी या योजनेतून निधी द्या, अशी सातत्याने विनंती करत गेल्या नऊ ते दहा वर्षात दत्तात्रय खवळे यांनी प्रभागाला कोट्यावधी रुपयांचा निधी खेचून आणला. दत्तात्रय खवळे हे अत्यंत मनमोकळे आणि सर्वसामान्य कार्यकर्त्याला किंमत देणारे व्यक्तिमत्व असल्यामुळे त्यांच्या सभोवताली कार्यकर्त्यांची असलेली गर्दी पाहून विरोधकांना देखील आता प्रचारासाठी माणसे शोधावी लागत आहेत. राजन पाटील यांनी आपली पूर्ण ताकत या प्रभागातील उमेदवार शाहिस्ता मुस्ताकभाई शेख आणि दत्तात्रय मनोहर खवळे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी केल्यामुळे या प्रभागातील वातावरण पूर्णतः भाजपमय झाले आहे.

## संपादकीय

# बदलता खेळ

सुरक्षा संस्थांच्या एका चुकीमुळे मोठे नुकसान आणि जीवितहानी होत असते. जेव्हा सुरक्षेतील त्रुटीमुळे एखादी दुर्घटना होते तेव्हा सुरक्षा संस्थांना टीकेला सामोरे जावे लागते. त्यांनी अगोदर केले असलेले आणि सतत करत असलेले त्यांचे चांगले काम झाकोळले जाते. त्यांनी शत्रूच्या अनेक नापाक मनसुब्यांना उधळून लावलेले असते, तेही दुर्लक्षित होते आणि त्यांना प्रखर टीकेचा सामना करावा लागतो. दिल्लीत लाल किल्ल्याजवळ झालेला स्फोट ही अशीच घटना आहे. सुरक्षा संस्थांचे उत्तरदायित्व निश्चित करण्याच्या चर्चा आणि मागण्या होत आहेत. ते रास्तही आहे, तथापि दिल्लीत जे काही घडले तो एका बदलत्या आणि देशविरोधी शक्तींना पोषक वातावरण उपलब्ध करून देर्णाया वातावरणाचा एक भाग आहे आणि भविष्यात आपल्याला सातत्याने सावधच राहावे लागेल याची जाणीव करून देणारा आहे. दिल्लीत ज्या दिवशी स्फोट झाला त्याच्या काही तास अगोदरच सुरक्षा संस्थांनी फरीदाबाद येथे डॉक्टरांचा भरणा असलेले दहशतवादी मॉड्युल उद्ध्वस्त केले होते.

त्यानंतर अचानक राजधानीत स्फोट झाला. दहशतवादी बिथरल्यामुळे त्यांनी हे अचानक कृत्य केले किंवा भीतीतून त्यांच्याकडून हे घडले असे मानले जाते. त्यात तथ्यही आहे, मात्र त्याचवेळी त्यांनी ज्या भागात स्फोट घडवून आणला आणि त्याची जी वेळ निश्चित केली तीही विचारपूर्वक केली होती हेही दुर्लक्षित करता येत नाही. 'ऑपरेशन सिंदूर'नंतर करण्यात आलेले हे स्फोट होते आणि त्याकरता दिल्लीचीच निवड केली गेली. जेथे स्फोट झाले तो लाल किल्ल्याचा परिसर होता. येथूनच स्वातंत्र्य दिनी पंतप्रधान देशाला उद्देशून भाषण करत असतात. त्यात देशाच्या प्रगतीची आणि सुरक्षेची ग्वाही दिली जाते. त्याच ठिकाणी अपघातानेही असेल कदाचित दहशतवाद्यांनी स्फोट घडवला. हजारो किलोची स्फोटके जप्त करण्यात सुरक्षा संस्थांना यश आले होते. त्याकरता ते प्रशंसेस पात्र आहेतच.

कारण जर ती जप्ती झाली नसती तर 26 जानेवारी अथवा त्याच्याही अगोदर सुनियोजितपणे अनेक ठिकाणी स्फोट घडवून आणण्यात आणि असंख्य लोकांची हत्या करण्यात दहशतवाद्यांना यश आले असते. स्फोटकांची ती गाडी घेऊन डॉक्टर असलेला आत्मघाती हल्लेखोर बराच वेळ राजधानीत फिरत होता तरीही कोणत्याही तपास यंत्रणेच्या जाळ्यात तो अडकला नाही ही आपल्या सुरक्षा यंत्रणेतील गंभीर त्रुटीही समोर आली व तीही देशाच्या राजधानीत. सरकारला आणि सर्वच यंत्रणांना त्याचा विचार करावा लागेल. दिल्ली स्फोटाच्या संदर्भात यावेळी एक वेगळा प्रकार घडला तो असा की सामान्यतः कोणतेही दहशतवादी अमानुष कृत्य घडवून आणल्यानंतर तातडीने कोणतीतरी दहशतवादी संघटना त्या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारते. त्यांच्या दृष्टीने हा अभिमानाचा विषय असतो.

ते ऑपरेशन सिंदूरच्या तडाख्यामुळे असेल किंवा पाकिस्तानने आपला खेळ बदलला असेल म्हणून अशी कोणतीही संघटना पुढे आली नाही. सुरुवातीच्या तपासात जे धागेदोरे आढळले त्यांचे तार अगोदर तुर्कीएकडे आणि नंतर बांगलादेशकडेही जाणारे निघाले. पाकिस्तानशी तुर्कीएची होत असलेली चुंबाचुंबी आणि बांगलादेशचे सध्याचे भारताच्या विरोधातले चेकाळलेपण पाहता जे तार दिसत होते ते विश्वासार्ह होते. अर्थात, दहशतवादी हल्ल्याचे हे धागेदोर कुठेही जात असले तरी त्याचे उगमस्थान कुठले आहे ते भारताला आणि येथील तपास संस्थांना समजायला वेळ लागत नाही आणि मुळात ते अत्यंत क्लिष्ट आणि अवघड कधीच नसते कारण पाकिस्तान कुठेतरी त्यांच्या लायकीनुसार त्यातून डोकावतोच आणि उघडा पडतो.

संबंधित आत्मघाती हल्लेखोराच्या समोर आलेल्या व्हिडिओ क्लिपने नंतर पाकिस्तानचे कनेक्शन उघडच केले. या दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानने आणखी काही वेगळे खेळ करण्याचा प्रयत्न यावेळी केला. मोठी घटना घडल्यावर भारताकडून सिंदूर कारवाई पुन्हा सुरू होण्याची शक्यता गृहीत धरून त्यांनी त्याच दिवशी इस्लामाबादेत न्यायालयाच्या परिसरात झालेल्या बॉम्बस्फोटावरून भारताच्या नावाने बोंबाबोब सुरू केली. खुद्द पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनीच भारतावर आरोप केले. बलुचिस्तानात सातत्याने होत असलेल्या हल्ल्यांशी त्यांनी भारताचा संबंध जोडण्याचा प्रयत्न अलीकडच्या काळात कसोशीने चालवला आहे. त्यांनी हा नवा प्रयोग करून पाहिला असला तरी तो मुळातच फसला कारण कोणीही त्यावर विश्वास ठेवला नाही. भारतीयांना प्रश्न असा पडला आहे की ऑपरेशन सिंदूर अंतर्गत दहशतवाद्यांचे मोठे तळ बेचिराख केल्यानंतरही पाकिस्तान इतका सक्रिय कसा झाला आहे ?

त्याचे उत्तर अमेरिकेशी नव्याने वाढलेल्या जवळीकीत आहे. इतिहास साक्ष आहे की जेव्हा जेव्हा अमेरिकेने पाकिस्तानच्या डोक्यावर हात ठेवला तेव्हा त्या देशाचे धाडस वाढले आहे. ट्रम्प यांच्या दुर्सया काळात तेच घडते आहे. पाकिस्तानचे पंतप्रधान आणि लष्कर प्रमुख व कथित फिल्ड मार्शल मुनीर यांची वॉशिंग्टनसमोर सुरू असलेली हुजरेगीरी ट्रम्प यांचा इगो सुखावणारीच आहे. ओबामांच्या राजवटीत व नंतरही बायडेन यांच्या चार वर्षांच्या काळात अमेरिकेने पाकिस्तानला एका मर्यादेत ठेवले होते. ते बंधन ट्रम्प यांनी शिथिल केले. त्यामुळेच पहलगाम येथे पर्यटकांवर हल्ला झाला. त्याला भारताकडून पाकिस्तानला अनपेक्षित असा प्रतिसाद दिला गेला तरी शरीफ आणि मुनीर यांच्या वॉशिंग्टन वाऱ्यांमुळे आणि तुंबलेली आर्थिक मदत पुन्हा सुरू झाल्यामुळे पाकिस्तान दिल्ली व अन्यत्र मोठे स्फोट घडवण्याचे कट रचण्याचे धाडस करू शकला. हा नवा खेळ आहे. सुरक्षा यंत्रणांनाच नाही, संपूर्ण देशाला अत्यंत सावध राहावे लागेल.

# महिलांवरील हिंसाचार आणि सामाजिक वास्तवता

२५ नोव्हेंबर, म्हणजेच (International Day for the Elimination of Violence Against Women) महिलांवरील हिंसाचार निर्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय दिनाच्या पार्श्वभूमीवर, भारतातील महिलांवरील गुन्ह्यांविषयीचा ताजा अहवाल समजून घेणे गरजेचे आहे. National Crime Records Bureau (NCRB) यांनी प्रसिद्ध केलेल्या 'Crime in India 2023' या अहवालात दाखवले आहे की या देशात महिलांविरुद्ध घडत असलेल्या घटनांचा केवळ कायद्याचा प्रश्न नसून ते सामाजिक संरचना, संस्कृती, आर्थिक व राजकीय परिस्थिती यांच्याशी खोलवर गुंतलेले आहेत. अहवालानुसार वर्ष २०२३ मध्ये महिलांविरुद्ध नोंदवलेल्या गुन्ह्यांची संख्या ४,४८,२११ इतकी झाली आहे, जी २०२२ च्या ४,४५,२५६ पेक्षा किंचित अधिक आहे. या संख्या दर्शवतात की अशा गुन्ह्यांची वाढ थांबलेली नाही, उलट ती घटलेल्या नसून वाढत्या रूपात आहे. राष्ट्रीय पातळीवर प्रति लाख महिला लोकसंख्येमागील गुन्ह्यांचा दर ६६.२ इतका होता.

या आकड्यांचा सामाजिक अर्थ असा आहे की महिलांचे वैयक्तिक जीवन, कौटुंबिक संबंध, सार्वजनिक स्थान हे सर्व असुरक्षिततेच्या छायेखाली आहेत. ठउफइ अहवालात सर्वात मोठा गुन्हा प्रकार नोंदवलेला आहे तो म्हणजे 'पती किंवा त्याच्या नातेवाईकांद्वारे क्रूरता' (Cruelty by husband or his relatives) हा प्रकार अजूनही महिलांविरुद्ध होणाऱ्या अधीकृत गुन्ह्यांत सुमारे २९.८% पर्यंत आहे. याचा अर्थ असा की महिलांचे हिंसाचारातील मुख्य माध्यम हे बऱ्याच वेळा घरी, नातवंडीत, विश्वासाच्या परीघातच आहे. जेथे ती सुरक्षित असावी, त्या ठिकाणी तिच्यावर अत्याचार होतो. हे सामाजिक दृष्टीने अत्यंत चिंताजनक आहे कारण ते लिंगआधारित असमानता व पारंपरिक लिंगभूमिकांचे प्रतीक आहे.

राज्यस्तरावर परिस्थिती अधिक गुंतागुंतीची दिसते. उदा. उत्तर प्रदेशमध्ये २०२३ मध्ये महिलांविरुद्ध गुन्ह्यांची सर्वाधिक संख्या नोंदवली गेली आहे. काही राज्यांमध्ये प्रति लाख महिला किंवा एकूण किती प्रकरणे हाताळली जातात यातील फरक हा सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय भिन्नतेचा परिणाम आहे. बहुधा, ज्या ठिकाणी सामाजिक जागृती कमी आहे, पोलीस-तपासणे व नोंदणीचे यंत्रणा कमजोर आहेत, तिथे वास्तव घटना अजून जास्त असतात पण नोंद होतात कमी होते. हेही लक्षात घ्यावे लागेल की अधिक संख्या म्हणजे केवळ असुरक्षिततेचा वाढता प्रमाण नाही, तर ती त्या प्रदेशात महिलांना तक्रार करण्याचा भराव अधिक झाला आहे, असेही सांगू शकते म्हणजे कि नोंद वाढणे म्हणजे सामाजिक जागृतीचा दिवा पण असू शकतो.

समाजशास्त्रीय दृष्ट्या, महिलांवरील हिंसाचाराचे कारण केवळ वैयक्तिक असंतुलन, व्यक्तिगतरूपी आव्हाने किंवा गुन्हेगारी प्रवृत्तीच नाही; हे सामाजिक-संस्कृती, आर्थिक असमानता, आणि लिंग-वाद्य संरचनांचा परिणाम आहे. उदा. अनेक सामाजिक संस्कृतीत महिलांना आर्थिकदृष्ट्या पुरुषांवर अवलंबित्व असणे, तिच्या अक्षमता किंवा निर्बलतेची धारणा असणे, आणि तिच्या सशक्त स्वरूपाला विरोध असणे अशा विविध पद्धतीने हिंसाचाराचा पाया घालतात. घरी पती किंवा त्याच्या नातेवाईकांकडून होणारी क्रूरता यामागे 'पतीचा अधिकार' किंवा 'घर चालवायची जबाबदारी' अशा जुनाट लिंगभूमिका वचनबद्ध असतात. अशा भूमिकांमध्ये महिला म्हणजे 'अधिकाऱ्याच्या मुलगी' किंवा 'घरच्या कामासाठी' अशी विशेष भूमिका बजावावी, अशी अपेक्षा असते. ही अपेक्षा तिच्या स्वायत्ततेशी, निर्णय-स्वातंत्र्याशी, सामाजिक सहभागाशी छेडछाड करते. त्यामुळे तिच्या अस्तित्वाच्या विविध पैलूंवर म्हणजेच आर्थिक, सामाजिक, वैयक्तिक दबाव निर्माण होतो.

तसेच, हिंसाचाराचे स्वरूप बदलत चालले आहे. जरी अहवालात बलात्कार, किडनॅपिंग / अपहरण या प्रकारातील गुन्ह्यांमध्ये काही प्रमाणात घट दिसली असली तरी, ऑनलाईन हिंसा, सायबर छळ, तसेच सार्वजनिक व खाजगी ठिकाणी छेडछाडी यांसारखे प्रकार वाढण्याचा धोका दाखवतात. या बदलत्या स्वरूपामुळे पारंपरिक सुरक्षात्मक उपाय पुरेसे नाहीत, नवे धोके ओळखण्यासाठी सामाजिक-संस्थात्मक प्रतिसाद बदलावा लागणार आहे.

NCRB अहवालानुसार, गुन्ह्यांची संख्या जरी थोडी वाढली असली तरी प्रक्रियात्मक कामगिरी अजून अपूर्ण आहे. उदा. देशातील चार्जशीटिंगचे प्रमाण २०२३ साली ७७.६% इतके होते. म्हणजे गावापासून महानगरापर्यंत पोलीस तपासणे व न्यायालयीन निकालप्राप्ती यामध्ये मोठा अंतर आहे. न्यायप्रक्रियेत होणारी अतिस्थिरता, प्रलंबित प्रकरणे, पीडितांच्या बाजूने सुरक्षात्मक उपायांची कमतरता हे सर्व महिलांच्या हिंसाचारविरुद्ध लढ्यात मोठे अडथळे आहेत. सामाजिक दृष्ट्या हे दाखवते की कायदा-व्यवस्था बदलण्यापुरती नाही, त्याबरोबर सामाजिक चेतना वाढवणे, समुदायांना जागरूक करणे आणि महिलांचे सकारात्मक बदल घडवणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

एखाद्या समाजशास्त्रीय आराखड्यातून बघितले, तर महिलांवरील हिंसाचार तीन प्रमुख स्तरावर समोर येतो. व्यक्तिगत, संबंधात्मक आणि संरचनात्मक. व्यक्तिगत स्तरावर म्हणजे एखादी महिला प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे अनुभवते ते; संबंधात्मक स्तर म्हणजे तिच्या कौटुंबिक, वैवाहिक, नातेवाईक परस्पर संबंधात होणारी हिंसा; आणि संरचनात्मक स्तर म्हणजे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय परिस्थिती जे तिच्या असुरक्षिततेला जन्म देतात. ठउफइ 2023 च्या आकड्यांत या सर्व स्तरांचे प्रतिबिंब दिसते. उदा. पती-नातेवाईकाद्वारे क्रूरतेचे प्रमाण जास्त हे संबंधात्मक स्तरावरची समस्या दर्शवते; राज्यांमध्ये फरक हे संरचनात्मक असमानतेचा परिणाम आहे.

या संदर्भात पुढे विचार करावा लागेल की महिलांना सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरण देण्याऐवजी फक्त कायदे बनवणे पुरेसे नाही. साक्षरता, आर्थिक स्वावलंभ, सुरक्षित सार्वजनिक ठिकाणे, गर्दीपासून दूर चालण्यायोग्य रस्ते, रात्री महिलांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना हे सर्व उपाय आवश्यक आहेत. महिलांना निर्णय प्रक्रियेत भाग घेता यावे, स्थानिक स्वराज्य व्यवस्था, ग्रामसभेतील निर्णय-प्रक्रिया, स्थानिक वाहिनींमध्ये महिला नेतृत्व वाढावे. त्यांनी स्वतःच्या जगण्याचा अनुभव बदलावा आणि समाजाने त्या बदलाला पाठिंबा द्यावा. ही प्रक्रिया वेगवान करण्यासाठी शाईप्रेरित कार्यक्रम, लोकशिक्षण, माध्यमांमाध्यमातून पुन्हा पुन्हा जनजागृती, स्त्री-पुरुष समता हे संदेश देण्यासाठी प्रभावी उपाय आवश्यक आहेत.

शिक्षणाच्या क्षेत्रातही विशेष लक्ष देण्याची गरज आहे. बालविवाह बंद करण्यासाठी, लिंग-आधारित भेदभाव विरुद्ध लढण्यासाठी, लैंगिक समानतेचा भाव जागवण्यासाठी शाळांमध्ये नियमितपणे कार्यक्रम असावेत. तेथील शिक्षक-शिक्षिका, शाळांतील विद्यार्थी हे बदलाचे ध्रुव असू शकतात. समाजातील जुनाट लिंग-भूमिकात्मक अपेक्षांना प्रश्न विचारण्याची, महिलांना स्वावलंबी बनवण्याची जबाबदारी सर्वत्र आहे. घरी, शाळेत, सार्वजनिक ठिकाणी आणि माध्यमांमध्ये.

न्यायप्रक्रिया आणि कायदा-व्यवस्था या बाबतीत देखील बदल अनिवार्य आहेत. पोलीस तपासणीत महिलांना योग्य संरक्षण दिले जावे, त्यांच्या तक्रारींना त्वरित प्रतिसाद मिळावा आणि आरोपींचे शीघ्र निष्पादन व्हावे. महिला हेल्प-लाइन, वन-स्टॉप सेंटर, काउन्सेलिंग सेवा, पुनर्वसन कार्यक्रम आणि आर्थिक सहाय्य या कार्यक्रमांची कामगिरी नियमितपणे तपासली जावी. समाजातील सर्व घटक म्हणजे स्थानिक प्रशासन, गुन्हे नोंदविणाऱ्या विभाग, महिलांचे स्वावलंबन घटक, स्वयंसेवी संस्था हे एकत्र येऊन ॲक्टिव भूमिका बजावावी. वाढत्या सायबर-हिंसेच्या पार्श्वभूमीवर ऑनलाइन सुरक्षिततेबाबत जन-जागृती करणे तितकेच गरजेचे आहे.

या सर्वांमुळे, आज २५ नोव्हेंबर या दिवशी आपण फक्त स्मरण करतो इतकेच नव्हे, तर वास्तवात उपयोगी, परिणामकारक पावले उचलण्याची प्रतिज्ञा करतो हे महत्त्वाचे आहे. ठउफइ 2023 च्या ताज्या आकड्यांमुळे आपल्यासमोर हिंसाचाराची विशाल पण गुप्त वाहिनी प्रकट झाली आहे आणि समाजशास्त्रीय दृष्ट्या हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे की परिवर्तन हा एक प्रवास आहे. त्यात फक्त कायदा-व्यवस्था बदलणे पुरेसे नाही, तर सम्पूर्ण समाज बदलणे गरजेचे आहे. प्रत्येक शाळा, प्रत्येक घर, प्रत्येक स्थानिक स्वयंसेवी संस्था, प्रत्येक माध्यम या यात्रेत सहभागी असावी. तरी हा दिवस अर्थपूर्ण ठरेल आणि प्रत्येक महिला सुरक्षित, सशक्त आणि समावेशी जीवन जगू शकेल.

आजचा दिवस म्हणजे नुसता दिवाळी साजरी करणे नव्हे, तर त्या दिवशी नव्याने उघडलेल्या वास्तवाबद्दल जागरूक होण्याचा, बदलासाठी झोकून देण्याचा, आणि सामाजिक बदलासाठी वाहक ठरण्याचा दिवस आहे. २५ नोव्हेंबर म्हणजे स्मरण करण्याचाच नाही तर संरचना बदलण्याचा, संस्कृती बदलण्याचा, आणि प्रत्येक स्त्रीच्या हक्कांना सन्मान देण्याचा प्रवास पुढे नेण्याचा दिवस असावा. आपला समाज स्त्री-पुरुष समतेकडे वाटचाल करताना, प्रत्येक महिलेला हिंसाचारमुक्त जीवनाचा अधिकार आहे, हा दृढ विश्वास आपल्यात निर्माण व्हावा. हीच माझी प्रतिज्ञा आणि आपण सर्वांची जबाबदारी आहे.



डॉ. राजेंद्र बगाटे
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. ९९६०१०३५८२,
bagate.rajendra5@gmail.com

## प्रबोधन

# जितेपणी कीर्ती । लाभेना भारती

'कीर्ती हवी असेल तर तिचा पाठलाग करू नका तिच्याकडे पाठ फिरवा,' असं साने गुरुजी म्हणाले. पण एका संस्कृत सुभाषितकाराने हा विचार मोडीत काढण्यासाठी 'काहीही करा, मूखार्सारखं वागा, पण प्रसिद्धी मिळवा' असं ठासून सांगताना म्हटलं, घटं भिंद्यात पटं छिंद्यात, कुर्यात रासभारोहणम ! येनकेन प्रकारेन प्रसिद्धपुरुषो भवेत ॥ अर्थात, ह्यगाडगीमडकी फोडा, कपडे फाडा किंवा गाढवावर बसून फिरा, पण काहीही करून एकदाचे प्रसिद्धीचे धनी व्हा.' प्रसिद्धीच्या मागे हात धुऊन लागल्यावर थोडीफार प्रसिद्धी मिळते. पण त्यासाठी केलेला व्यवहार लपून राहात नाही.

खरं तर प्रसिद्धीला हपापलेल्या व्यक्ती मात्र सामान्यच असतात. असामान्य माणसं प्रसिद्धीविन्मुख असतात. थोर मानवतावादी संत गाडगेबाबा कीर्तनासाठी कधी येत आणि कधी कीर्तनातून गायब होत, हे लोकांना कळतच नसे. कुणी त्यांच्या पाया पडू लागला, तर त्याच्या पाठीत खराट्याचा असा तडाखा ते मारत, की पुन्हा त्याने कधी तसा प्रयत्न करू नये. त्यांना प्रसिद्धीचा मनापासून तिटकारा होता. डॉ. उद्धव रसाळे यांनी लिहिलेली एक आठवण फार बोलकी आहे. नाशिकच्या धर्मशाळेत गाडगेबाबांच्या भक्तांनी, सेवकांनी बाबांचा पुतळा बसवला. बाबांना हे समजलं. बाबा नाशिकला आले. त्यांनी सेवकांना खडसावलं आणि आपल्या हाताने पुतळ्याचे तुकडेतुकडे करून तो फोडून टाकला. कीर्तीविमुखतेचं इतकं चांगलं उदाहरण अन्यत्र शोधूनही सापडणार नाही.


गाडगेबाबांना त्यांच्या जिवंतपणीच कीर्ती, प्रसिद्धी अमाप लाभली. पण इतर बऱ्याच थोर पुरुषांना जिवंतपणी उपहास, लोकनिंदा आणि सामाजिक टीका सहन करावी लागली. अशा व्यक्ती मेल्यानंतर ते किती थोर होते, हे समाजाला कळतं, म्हणूनच 'कीतीर्चे मंदिर हे मृतांच्या समाधीवर उभारतात,' असं पाश्चात्त्य विचारवंत डब्ल्यू हेझलिट् म्हणतात. आज संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम ज्ञानोबा माऊली, ज्ञानराज माऊली तुकाराम अशा रूपाने वारकऱ्यांच्या गळ्यातील कंठहार झाले आहेत. त्यांचं स्मरण हजार वर्षांनंतरही उत्कटपणे केलं जातं. पण त्यांच्या जिवंतपणी त्यांना समाजाने ज्या यातना दिल्या आणि मृत्यूच्या दरीत त्यांना ढकलण्याचं निंद्य कृत्यही केलं, हे कधीही विसरता येणार नाही.

कोपर्निकस ह्या थोर शास्त्रज्ञाने सूर्यकेंद्रित विश्व सिद्धान्त मांडून पाश्चात्त्य धार्मिक सनातन्यांच्या समजुतीला जबर धक्का दिला, म्हणूनच तो जिवंत असेपर्यंत त्याला निंदेचा विषय व्हावं लागलं. कोपर्निकसच्या सिद्धान्तांवर आधारित संशोधन करणाऱ्या गॅलिलिओ गॅलिलीला तर न्यायालयाने आठ वर्षं तुरुंगवासाची शिक्षा केली आणि मी केलेलं संशोधन खोटं होतं, असा कबुलीजबाब सक्तीने घेतला. आकाशनिरीक्षणाची पहिली दुर्बिण तयार करणारा हा खगोलशास्त्रज्ञ सक्तीच्या एकांतवासात मरण पावला. पण आज जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ म्हणून कोपर्निकस आणि गॅलिलिओ यांचं नाव घेतलं जातं. सजीवांच्या क्रमिक विकास सिद्धान्ताचे जनक चार्लस डार्विन तर अद्यापिही बायबल आणि चर्चनिष्ठ समाजाच्या दृष्टीने पाखंडीच असून अमेरिका आणि युरोपमधील विज्ञानाच्या पुस्तकांत त्यांचा सिद्धान्त अनेक संस्थांनी समाविष्ट करण्यास विरोध केला आहे.

तरीही उशिरा का असेना, पण पाश्चात्त्य जगाने शास्त्रज्ञांना जेवढी प्रसिद्धी आज दिली आहे, तेवढी त्यांच्या देशातील अन्य कोणत्याही क्षेत्रातील व्यक्तींना दिलेली नाही; हे वास्तव आहे. पण भारताचं वैचारिक विश्व धार्मिक प्रदूषणाने नासलेलं असल्यामुळे आपल्या देशात धार्मिक नेत्यांचा, धर्मगुरू, धर्मचार्यांचाच बडेजाव अधिक दिसून येतो. प्रा. मा. का. देशपांडे म्हणतात, 'ज्या क्षणी नील आर्मस्ट्राँगने चंद्र भूमीवर आपला पाय ठेवला, त्याच क्षणी भारतातील तेहत्तीस कोटी देवांपैकी एका देवतेच्या डोईवर उभे राहून त्या देवतेचा अपमान केला, असे उद्गार भारतीय वारकऱ्यांनी काढले.'

भारतात प्रसिद्धीचे दिवे कोणाला ओवाळायचे, हे एका राष्ट्रव्यापी अलिखित धोरणानेच भटी प्रचार-प्रसार माध्यमांनी ठरवून समस्त समाजाच्या आत्मोन्नतीवर ममार्घाती प्रहार केला आहे. ह्या कुटिल धोरणाचा पदार्फाश करताना डॉ. आ. ह. साळुंखे लिहितात, 'येथे वर्तमानपत्रातील वाचकांच्या पत्रव्यवहारात चार ओळी छापून यायच्या झाल्या, तरी प्रस्थापितांच्या सुरात सूर मिसळावा लागतो ? याउलट भिन्न मतं मांडणाऱ्या स्वाभिमानी बहुजन समाजाला धर्मद्रोही, देशद्रोही, परधार्जिणे ठरवून बदनाम केलं जातं आणि कर्तृत्ववानाच्या कर्तृत्वाला कधीही जुमानलं जात नाही.' समाजातील अत्युच्च शिखरांनाही आपल्यातील टेकड्यांहून ठेंगणं मानण्याचा उद्योग माध्यमातले सनातनी हुकूमशहा रात्रंदिवस करीत असतात. आज गौतम बुद्ध आणि कबीर असते, तर त्यांनाही या व्यवस्थेने अनुल्लेखानेच मारलं असतं. 'या देशातील ब्राह्मणी व्यवस्थेमुळे ज्ञानप्रसार झाला नाही' असं डॉ. अमर्त्य सेन म्हणाल्यामुळे त्यांना परधार्जिणे ठरवण्याचा निंद्य प्रकार या देशात घडावा, हे चिंताजनक आहे. जातीयतेच्या चिखलातून बाहेर पडण्याचा संकल्प आता सर्वांनी केला पाहिजे, हाच खरा देशोद्धार असेल. कारण-

मरोनी उरावे । कीर्तीच्या रूपाने
संताच्या मुखाने । सत्य आले ॥१
जितेपणी कीर्ती । लाभेना भारती
हाल हाल होती । जिवंतांचे ॥२
लाथ जितेपणी । मृता मिळे खांदा
सांगतात वांधा। गोविंदाग्रज ॥ ३
विषमतावाद्यांना । लाभतसे कीर्ती
वीर म्हणविती । त्रिखंडाचे ॥४
कीर्ती अशी हवी । दिशाकालातीत
जातीधमार्तीत । पृथ्वीवर ॥५
शास्त्रज्ञांची कीर्ती । गावी निशीदिनी
निश्चिंती जीवनी । ज्यांनी दिली ॥६
चार्वाक गौतम । फुले आणि गांधी
समाजा सुगंधी । केले त्यांनी ॥७
माणसाला सुखी । ज्यांनी जगी केले
जगाने वंदिले । महात्म्यांना ॥८



प्रा. डॉ. जे. बी. शिंदे
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# संविधान बचाव समितीचा सोलापुरात बुधवारी महामोर्चा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** संविधान बचाव समितीच्या वतीने बुधवार दि. 26 नोव्हेंबर 2025 रोजी दुपारी 12 वाजता जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात मुस्लिम, भटके विमुक्त, बौद्ध यांच्यासह बहुजन समाजातील सुमारे एक लाख नागरिक, कार्यकर्ते संविधान समर्थक सहभागी होणार आहेत, अशी माहिती ज्येष्ठ नेते तथा निमंत्रक सुभानजी बनसोडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



संविधानाचा अंमल सुरू होऊन 75 वर्षाचा कालावधी लोटला आहे. संविधानामुळेच विविध जाती धर्माचे आणि विविध भाषा बोलणारे लोक एकत्र नांदत आहेत. संविधानामुळेच भारत अखंड आणि एकात्म राहिला आहे. सर्वांना स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय प्रदान केला जात आहे असे असतानाही भारतीय संविधानाला संपविण्याचे कट कारस्थान रचले जात आहे. त्यामुळे देशाचे संविधान वाचवावे या मागणीसाठी हा मोर्चा काढण्यात येणार आहे.

बुधवारी सकाळी 11 वाजता संविधान समर्थकांचा हा महामोर्चा न्यू बुधवार पेठ येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथून निघणार आहे. पुढे सम्राट चौक छत्रपती शिवाजी महाराज चौक, नवी वेस पोलीस चौकी मार्गे सरस्वती चौक, चार हुतात्मा पुतळा चौक, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालय पुनम गेट येथे या मोचार्चा समारोप होणार आहे. या ठिकाणी या मोर्चाचे सभेत रूपांतर होईल. या मोर्चामध्ये बहुजन समाजातील संविधान समर्थक सर्व घटकांचा सहभाग राहणार आहे. सोलापूर शहर जिल्ह्यातील लोक लाखोच्या संख्येने उपस्थिती दर्शविणार आहेत.

राष्ट्रपती, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यांना अपमानास्पद वागणूक दिली जात आहे. देशात वाढलेली बेरोजगारी, विद्यार्थी, शेतकऱ्यांचे, कामगार कष्टकरी, शेतमजुरांचे प्रश्न, सरकारचे शैक्षणिक धोरण, शिष्यवृत्ती, कंत्राटी पद्धत बंद करून सुशिक्षित बेरोजगारांना सरकारी नोकऱ्या देणे, शिक्षणाचे खाजगीकरण थांबवावे, वैज्ञानिक दृष्टिकोनातून मोफत शिक्षण द्यावे, आरएसएस सह सर्व एनजीओची सक्तीने नोंदणी करावी, आरक्षणातील अ - ब- क- ड वर्गीकरण रद्द करावे, एससी, एसटी, ओबीसी यांना क्रिमीलेअर लावू नये, आरएसएस या संघटनेवर बंदी घालावी यासह इतर मागण्यांसाठी हा महामोर्चा काढण्यात येणार आहे, असे निमंत्रक सुभानजी बनसोडे यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस जनार्दन शिंदे, अशोक जानराव, अण्णासाहेब भालशंकर, राजा सोनकांबळे, मिलिंद प्रक्षाळे, रॉकी बंगाळे, अशोक आगावणे, सच्चिदानंद व्हटकर, प्रमिला तूपलवंडे, संध्या काळे , व्ही. डी. गायकवाड यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## वात्रटिका

### घडते बिघडते

आता झाकून काय उपयोग
जे बघायचे ते बघून झाले...
बेबनाव कधीच नव्हता म्हणा
पण लोकांना सारे कळले...
ही सुरुवात आहे अजून
काही काही घडणार आहे...
जुळलेले दिसते ते तुटणार
आणि पुन्हा बिघडणार आहे...

हणमंत पडवळ,
धाराशिव,
8698067566

# अकलूजचा विकास अद्याप कागद पत्रावरच - उर्वशीराजे मोहिते पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूजचा विकास अद्याप कागद पत्रावरच असून, तो प्रस्थापितांच्या इच्छाशक्ती अभावी झाला नसल्याने, राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या माध्यमातून आणि पद्मजादेवी मोहिते पाटील व धवलसिंह मोहिते पाटील यांच्या साथीने विविध सामाजिक कार्यामध्ये सहभागी होत असताना, अकलूज नगरपालिका निवडणुकीसाठी चार प्रभागातून प्रतिनिधित्व करण्यासाठी वेगवेगळ्या स्थरातून आग्रह केल्यामुळे, अकलूज नगर परिषद निवडणूक 2025 च्या निवडणुकीत उतरण्याचा निर्णय घेतल्याचे राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार उर्वशीराजे धवलसिंह मोहिते पाटील यांनी सांगितले.

सामाजिक काम करत असताना सर्वसामान्य कुटुंबातील येणाऱ्या संपर्क वेळी शहरातील पाणीपुरवठा स्वच्छता रस्ते दिवाबत्ती व वाहतूक कोंडी अशा विविध अडचणी लोक बोलून



दाखवत होते. प्रस्थापिताकडे अनेक वेळा नागरिकांना अडचणी सांगण्यात मर्यादा येतात. प्रस्थापित किंवा प्रशासन आणि सामान्य जनतेत संपर्क करण्यासाठी सर्वसामान्यांच्या मध्यस्थीची गरज पडते यावेळी चोख भूमिका बजावून सर्वसामान्यांना न्याय देणार असल्याचे उर्वशीराजे मोहिते पाटील यांनी सांगितले.

सर्व समाजाच्या महापुरुषांच्या जयंती पुण्यतिथी कार्यक्रमासह घरगुती कार्यक्रमात ही आमचा सहभाग असतो, त्यामुळे प्रभागातील लोकप्रतिनिधी म्हणून मला नागरिक पसंती देतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. माझ्या प्रभागात समर्थकांची जोरदार मोर्चे बांधणी सुरू आहे. माझ्याबरोबर अनेक कार्यकर्ते होम टू होम प्रचार करत असून त्याला उत्तम प्रतिसाद मिळत आहे असे त्यांनी यावेळी सांगितले. अकलूज मधील मतदार हे आमचे कुटुंब आहे व त्यासाठी आम्ही काम करणार आहोत सर्व उमेदवार सुशिक्षित आहेत. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून अनेक विकासाची कामे आम्ही करणार आहोत असेही त्यांनी यावेळी सांगितले.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# पोलीस निरीक्षक जाधव यांच्यावरील गुन्हा रद्द

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** हकीकत अशी की, तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक धनंजय अ. जाधव सन 2009 ते 2011 या कालावधीत टेंभुर्णी पोलीस ठाणे येथे प्रभारी अधिकारी म्हणुन कार्यरत होते. निवृत्त पोलीस उप अधीक्षक काशिनाथ तळेकर यांचे वाघेवस्ती नजीकचे शेत धनाजी शिवाजी केदार रा. अरण यांनी दि. 10/10/2009 रोजी जेसीबीने उकारल्याची तक्रार पोलीस ठाणे येथे घेऊन आले होते. परंतु प्रथम दर्शनी सदरची तक्रार ही दिवाणी स्वरूपाची असल्याचे व सदर प्रकरणात वाद-विवाद असल्याचे लक्षात आल्याने तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांनी सदर प्रकरणाची चौकशी तत्कालीन पोलीस हवालदार प्रभाकर पाटील यांच्याकडे देऊन तळेकर यांच्या तक्रारीवरून 21 दिवसानंतर चौकशींती गुन्हा नोंद केला होता. गुन्हा उशिरा नोंदवल्याने तळेकर यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी करमाळा, अप्पर पोलीस अधीक्षक सोलापूर, पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण, विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापूर इत्यादी ठिकाणी तक्रारी अर्ज करून सहाय्यक पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. परंतु धनंजय जाधव यांनी गुन्हा नोंद करून कारवाई केली असल्याने अर्ज फाईल करण्यात आला होता. तळेकर यांनी राज्याचे पोलीस महासंचालक यांचेकडे गुन्हा दाखल करण्याची मागणी केल्याने तब्बल 12 वर्षांनी म्हणजेच सन 2022 साली तत्कालीन पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांच्या सूचनेवरून पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांनी धनंजय जाधव यांचेवर पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाणे येथे नेमणुकीस असताना पोलीस ठाणे टेंभुर्णी येथे शासकीय कर्तव्य पार पाडण्यात कसुरी केली या मथळ्याखाली गुन्हा नोंदवला होता. सदरचा गुन्हा नोंदवून तो



उपविभागीय पोलीस अधिकारी करमाळा यांच्याकडे तपासकामी दिला होता. कर्तव्यामध्ये आपली काहीही चूक नसताना अन्यायाची भावना निर्माण झाल्याने पोलीस निरीक्षक धनंजय अ. जाधव यांनी सदर दाखल केलेल्या गुन्ह्यास उच्च न्यायालय मुंबई येथे सन 2022 साली एका याचिकेद्वारे आव्हान दिले होते. सदर याचिकेच्या सुनावणी दरम्यान पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांनी घडलेल्या घटनेबाबत व पुराव्यानिशी तंत्रशुद्ध बाजू मांडली. फियार्दी तळेकर यांनीच आरोपीशी तडजोड केल्याची बाब माननीय उच्च न्यायालयाच्या लक्षात आणून दिली. माननीय उच्च न्यायालयाने पहिल्याच सुनावनीत सदर गुन्ह्याच्या तपासास स्थगिती देऊन पोलीस विभागाने याचिकाकर्ता म्हणजेच धनंजय जाधव यांच्या विरोधात कोणतीही कारवाई करू नये असा आदेश दिला होता. सदर याचिकेची अंतिम सुनावणी आज रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे सर्किट बेंच कोल्हापूर येथे झाली. धनंजय जाधव यांच्या विरोधात पोलीस ठाणे टेंभुर्णी येथे नोंद झालेली एफ.आय.आर. रद्द करण्याचा आदेश दिला आहे. न्यायालयाच्या निकालाने प्रामाणिकपणे कर्तव्य बजावणाऱ्यास आणखी कायदेशीर पाठबळ मिळाले असल्याचे मत पोलीस निरीक्षक जाधव यांनी व्यक्त केले आहे.

याचिकेचे कामकाज मुंबई उच्च न्यायालयातील निष्णात वकील विवेक साळुंखे यांनी पाहिले.

# अनाथांची माय सिंधुताई सपकाळ ची लेक मंगळवारी 25 नोव्हेंबरला सोलापुरात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यासाठी 'सोलापूर आयकॉन पुरस्कार सोहळा व पुस्तक प्रकाशन' हा भव्य कार्यक्रम मंगळवार, दि. २५ नोव्हेंबर २०२५ रोजी हिराचंद नेमचंद वाचनालय, सोलापूर येथे मोठ्या दिमाखात पार पडणार आहे. सोलापूरचा कर्तृत्वाचा ठसा राज्याच्या पलीकडे दृग्गोचर व्हावा आणि समाजासाठी समर्पितपणे कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव व्हावा हा या उपक्रमामागचा मुख्य हेतू आहे.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे 'सोलापूर आयकॉन' या पुस्तकाचे प्रकाशन. या पुस्तकामध्ये सोलापूर जिल्ह्यातील शिक्षण, आरोग्य, समाजसेवा, उद्योजकता, शेती, क्रीडा आणि कला या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय व प्रेरणादायी



कामगिरी करणाऱ्या व्यक्तींची जीवनयात्रा, संघर्ष आणि योगदानाचे प्रभावी वर्णन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या उज्ज्वल कामाची नोंद इतिहासात राहावी या उद्देशाने पुस्तकाची निर्मिती करण्यात आली आहे.

या सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे कारण अनाथांची माय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्व. सिंधुताई सपकाळ यांच्या कन्या आणि 'ममता फाउंडेशन'च्या अध्यक्षा सौ. ममता सिंधुताई सपकाळ या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर, मनोरमा बँकेचे चेअरमन श्रीकांत मोरे, प्रा. तेजस्विनी कदम, उद्योजक संग्रामभैया भालके, सरपंच परिषदेच्या सोलापूर जिल्हा अध्यक्ष कविता घोडके, सिने अभिनेत्री शितल ढेकळे, सिने अभिनेत्री शिवानी सह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमात जिल्ह्यातील निवडक व्यक्तींना सोलापूर आयकॉन पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून, त्यांच्या समाजहिताच्या कायार्चा गौरव केला जाईल. युवा पिढीसाठी प्रेरणादायी ठरणाऱ्या या व्यक्तींच्या सन्मानामुळे समाजात सकारात्मक बदलांची प्रेरणा मिळेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. सोलापूरकरांनी उपस्थित राहून या ऐतिहासिक सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# 10 हजार महिला कामगारांचा सोलापूर ते मंत्रालय पायी मोर्चा धडकणार - कॉ. आडम मास्तर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स (CITU) चे 17 वे सोलापूर जिल्हा अधिवेशन लाल बावटा कार्यालय, दत्तनगर येथे उत्साहात पार पडले. अधिवेशनाची सुरुवात कॉ नरसय्या आडम मास्तर यांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाली.

अधिवेशनाचे उद्घाटन राज्य CITU नेते व जिल्हा प्रभारी कॉ. वसंत पवार यांनी केले. आपल्या भाषणात त्यांनी केंद्र सरकारने 29 विविध कामगार कायद्यांचे चार श्रम संहितांमध्ये केलेले रूपांतर हे कामगार-विरोधी पाऊल असल्याचा आरोप केला.

ते म्हणाले, 'नवीन श्रम संहितांत लेबर कोर्ट व लेबर ऑफिसची संकल्पनाच संपवण्यात आली आहे. 60 टक्क्यांहून अधिक असंघटित कामगारांवर या कायद्यांचा गंभीर परिणाम होणार आहे. कामगारांनी एकजुटीने या धोरणांविरोधात उभे राहणे अत्यंत आवश्यक आहे.'




ते पुढे म्हणाले की असंघटित क्षेत्रातील कामगारांना सामाजिक सुरक्षा व पेन्शन देण्यासाठी CITU ने सातत्याने लढा दिला असून कामगारांच्या निवाऱ्याचे स्वप्न साकार करण्यातही संघटना यशस्वी ठरली आहे.

26 नोव्हेंबर रोजी चार श्रम संहितांविरोधात देशभरात कामगार संघटना रस्त्यावर उतरणार असल्याची त्यांनी घोषणा केली.

**अधिवेशनाचा अहवाल आणि कार्यवाही**

CITU जिल्हा सचिव ॲड. एम.एच. शेख यांनी मागील तीन वर्षांचा राजकीय व संघटनात्मक अहवाल सादर केला. 25 प्रतिनिधींनी चर्चेत सहभाग घेतला. जिल्हा कोषाध्यक्ष कॉ. दीपक निकंबे यांनी आर्थिक अहवाल मांडला. अहवाल सवार्नुमते मंजूर करण्यात आला.

शोकप्रस्ताव कॉ. विल्यम ससाणे यांनी मांडला.

कॉ नरसय्या आडम मास्तर, कॉ.व्यंकटेश कोंगारी,युसुफ शेख मेजर,नसीमा शेख, नलिनी ताई कलबुर्गी आदींनी अध्यक्षीय मंडळाचे काम पाहिले.

वृत्तांत लेखन समितीत दत्ता चव्हाण आणि किशोर मेहता यांनी काम पाहिले.

# आंदोलकांनी गव्हाणीत उतरून कारखाना केला बंद

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात उसदराच्या प्रश्नावरून शेतकऱ्यांचा रोष धगधगू लागला आहे. ऊसाला पहिली उचल ४००० रुपये देण्याची मागणी आणि ऊस दर जाहीर न करता गाळप सुरू न करण्याचा इशारा देत शेतकरी संघटनेने आज निमजाई साखर कारखान्यात गव्हाणीत उतरून ठिय्या आंदोलन केले. यामुळे कारखान्याचे गाळपकाम पूर्णतः ठप्प झाले.

शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शंकर गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली २० नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना विविध मार्गांनी निवेदने देण्यात आली होती.

त्यात ऊसाचा दर जाहीर करणे, ओव्हरलोड वाहतूक रोखणे, काटामार बंद करणे, व मागील थकित बिले देणे. या मागण्या ठामपणे मांडण्यात आल्या



होत्या. मागण्या न मानल्यास २३ नोव्हेंबरपासून आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला होता.

घोषणाबाजीच्या गजरात आज शेतकरी निमजाई कारखान्याच्या गव्हाणीत उतरले आणि प्रत्यक्ष ठिय्या देत कारखान्याला कुलूप लावण्यात आले. या आंदोलनात विजय रनदेवे, हनुमंत कापसे, उमेश यादव, मुसा मस्के, दत्ता कापसे, ज्ञानेश्वर पवार, किसन डिसले, दयानंद ढेंगळे आदींसह मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले.

हा लढा अधिक तीव्र करण्याचा इशारा देत शंकर गायकवाड म्हणाले, 'उस उत्पादनाचा खर्च आकाशाला भिडतोय. पण कारखानदार शेतकऱ्यांचा ऊस अक्षरशः फुकट भावात लुटत आहेत. हे तात्काळ थांबलेच पाहिजे.' तसेच त्यांनी संतप्त प्रतिक्रिया देताना म्हटले, 'शेतकरी वैतागला तर परिस्थिती कारखानदारांना परवडणार नाही. संघर्ष टोकाला जाईल.'


## ग्रामपंचायत मोडनिंब ता.माढा जि.सोलापूर

**टेंडर नोटीस**

ग्रामपंचायत मोडनिंब,ता.माढा,यांचेकडून खालील कामे करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदाराकडून बंद लखोट्यात निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाना रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | गावातील हायमास्ट दिवे दुरुस्ती करणे. | १,३३,१५२/- | - | २००/- | ६ महिने | विद्युत ठेकेदार |
| २) | घंटागाडी दुरुस्ती, कचरा कुंड्या खरेदी करणे. | ३,००,०००/- | - | २००/- | ६ महिने | सु.बे.अ वर्ग ५ |
| ३) | जि.प.शाळा शौचालय मुतारी दुरुस्ती करणे रिबोअर मोटार पाणी टाकी बसविणे. | १,४०,०००/- | - | २००/- | ६ महिने | सु.बे.अ वर्ग ५ |
| ४) | दत्तनगर मधील चेंबर दुरुस्ती व भु.गटार करणे. | १,००,०००/- | - | २००/- | ६ महिने | सु.बे.अ वर्ग ५ |
| ५) | महाडीक घर ते घमे घर भुमीगत गटार करणे. | १,०३,१३३/- | - | २००/- | ६ महिने | सु.बे.अ वर्ग ५ |
| ६) | अभिमन्यू गरड ते व्यवहारे घर ते रामोशी वाडा भु.गटार करणे. | १,२७,५००/- | - | २००/- | ६ महिने | सु.बे.अ वर्ग ५ |
| ७) | पालखी मार्ग येथे जाडकर वस्ती हातपंप रिबोअर मोटार दुरुस्ती. | १,१८,०००/- | - | २००/- | ६ महिने | सु.बे.अ वर्ग ५ |
| ८) | बाजार तळ येथे पाण्याची टाकी बसविणे. | ५०,४९८/- | - | २००/- | ६ महिने | सु.बे.अ वर्ग ५ |
| ९) | बाजार तळ येथे पाण्याची टाकी बसविणे. | ५०,४९८/- | - | २००/- | ६ महिने | सु.बे.अ वर्ग ५ |
| १०) | पाणी पुरवठा आर.ओ. प्रणाली व मोटार दुरुस्ती करणे. | २७,३८७/- | - | २००/- | ६ महिने | सु.बे.अ वर्ग ५ |
| ११) | पाणी पुरवठा आर.ओ. प्रणाली व मोटार दुरुस्ती करणे. | २७,३८७/- | - | २००/- | ६ महिने | सु.बे.अ वर्ग ५ |
| १२) | अंगणवाडीचे शौचालय दुरुस्ती करणे. | ६६,५७४/- | - | २००/- | ६ महिने | सु.बे.अ वर्ग ५ |
| १३) | गावातील आंगणवाडयांना आवश्यक त्या बाबींची पूर्तता करणे तसेच पाणी पुरवठा सोय करणे. | २,१८,५००/- | - | २००/- | ६ महिने | सु.बे.अ वर्ग ६ |

टीप: १) कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी दि.२५/११/२०२५ स. १०.०० पासून २) भरलेल्या निविदा स्वीकारण्याचा दि.०१/१२/२०२५ सायं ५.०० वा पर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय मोडनिंब ३) निविदा उघडणेचा दि.०२/१२/२०२५ रोजी स. १०.०० वाजता ४) निविदे संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ व २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळेल. ५) निविदा मंजूर,नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा निविदा रद्द करण्याचा अधिकार मा.सरपंच यांना राखुन ठेवला आहे.निविदा फॉर्म सुट्टीचे दिवस वगळून मिळतील व स्वीकारले जातील.

सही/- ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत
मोडनिंब,ता.माढा,जि.सोलापूर

शिक्का

सही/- सरपंच
ग्रामपंचायत मोडनिंब,
ता.माढा,जि.सोलापूर


# श्री शावरसिद्ध मंदिर बांधकामासाठी रामप्पा चिवडशेट्टी यांची रु. 51 हजारांची देणगी

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- आचेगाव येथील प्राचीन श्री शावरसिद्ध मंदिराच्या बांधकामासाठी स्थानिक भक्त, नागरिक आणि समाजबांधवांचे सहकार्य सातत्याने लाभत असून या पवित्र कायार्ला आज आणखी बळ मिळाले आहे. मंदिर उभारणीसाठी श्री रामप्पा सावकार चिवडशेट्टी यांनी रु. 51,000/- इतकी उदार देणगी अर्पण करून सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण घातले.

मंदिर समितीच्या वतीने देणगी स्वीकारण्यात आली. समितीने या सहकायार्ची मनापासून दखल घेत, बांधकामाच्या पुढील टप्प्यांना ही रक्कम निश्चितच हातभार लावणार असल्याचे सांगितले. धार्मिक आणि सामाजिक अशा दोन्ही अंगांनी महत्त्वपूर्ण असलेल्या या प्रकल्पासाठी मिळणारा प्रत्येक हातभार आणि देणगी ही गावाच्या विकासासाठीही मोलाची ठरणार असल्याचेही समितीने नमूद केले.

देणगी स्वीकार प्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यात



भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष महेश बिराजदार, इंद्रजीत लांडगे, शावरसिद्ध जळगोडर, दत्तात्रय पाटील, सौ. विश्रांती पाटील (सरपंच), रफिक मुल्ला (उपसरपंच), शावरसिद्ध पाटील, मेहबूब पटेल, चंदू शिलेणी, रायपा पुजारी, अशोक पाटील, कुलदीप पाटील, गेनसिद्ध चुंगीवडियर, अमोघसिद्ध चुंगीवडियर, बनसिद्ध चुंगीवडियर, मलकारी कांबळे, राहुल शिंदे, दिलीप विधाते, सिलिसिद्ध बहिर्जे, प्रशांत क्षीरसागर, बिलेनी करिवाडीयार, काशण्णा मेलीवाडीयार, गिरीश बाळगे, कुलदीप खताळ या मान्यवरांचा समावेश होता.

या प्रसंगी मंदिर बांधकामासाठी होत असलेल्या उपक्रमांची माहिती उपस्थितांना देण्यात आली. धार्मिक आस्थेने प्रेरित अशा कार्यात सर्व स्तरांतून मिळत असलेले सहकार्य प्रेरणादायी असल्याचे मान्यवरांनी नमूद केले. पुढील काळातही गावातील नागरिकांनी आणि भक्तांनी अशाच प्रकारे सहकायार्ची परंपरा कायम ठेवावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

श्री शावरसिद्ध मंदिराच्या उभारणीसाठी सुरू असलेला हा उपक्रम ग्रामस्थांच्या एकात्मतेचे प्रतीक ठरत असून, देवस्थानाच्या विकासासाठी मिळत असलेला हा ओघ भविष्यातही कायम राहील, अशी भावना समितीने व्यक्त केली.


**विकणे /भाड्याने देणे आहे**

वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.

**संपर्क : डी. बी. शिंदे**

**मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३**

**पत्ता:** अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

**-: संपर्क :-**

**8083608083**
**9922646566**
**8698732109**

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी

**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**

**9822964815**
**9421984815**

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.


**निरामय पॅरालिसिस सेंटर**

निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा ॲण्ड फिजिओथेरपी सेंटर

ISO 9001:2015

खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये

कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार



नांत आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं

समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था

मोबाईल नं. 9503310568

पत्ता: गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर



## ग्रामपंचायत मोडनिंब ता.माढा जि.सोलापूर

**टेंडर नोटीस**

ग्रामपंचायत मोडनिंब,ता.माढा,यांचेकडून खालील कामे करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदाराकडून बंद लखोट्यात निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाना रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | जि.प.शाळा इमारत दुरुस्ती,मैदान दुरुस्ती ब्लॉक करणे,शौचालय मुतारी कंपाऊंड वॉल दुरुस्ती तसेच मुरुमीकरण व पाण्याची सोय करणे. | १,००,०००/- | - | २००/- | ६ महिने | सु.बे.अ वर्ग ५ |
| २) | जि.प.शाळेच्या मैदानावर पेव्हर ब्लॉक, मैदान दुरुस्ती, खोल्या,शौचालय,मुतारी दुरुस्ती व मुरुमीकरण करणे. | १,५०,०००/- | - | २००/- | ६ महिने | सु.बे.अ वर्ग ५ |
| ३) | महिलांसाठी बाजार तळ येथे मुतारी बसविणे व अंगणवाडी साठी शोषखड्डे करणे. | २,४७,४००/- | - | २००/- | ६ महिने | सु.बे.अ वर्ग ५ |
| ४) | वॉर्ड क्र.४ मध्ये मुरुमीकरण करणे व RCC रस्ता करणे. | २,१७,०२४/- | - | २००/- | ६ महिने | सु.बे.अ वर्ग ५ |
| ५) | वॉर्ड क्र.४ मध्ये आवश्यक ठिकाणी रस्ता करणे. | ७,८१,९२०/- | - | २००/- | ६ महिने | सु.बे.अ वर्ग ५ |
| ६) | जगन्नाथ कदम घर ते गिड्डे घर सिमेंट कॉंक्रीट रस्ता करणे. | २,८६,०००/- | - | २००/- | ६ महिने | सु.बे.अ वर्ग ५ |
| ७) | अंगणवाडीसाठी स्वच्छतागृह व्यवस्थापन व सुधारणा करणे व सुशोभीकरण करणे. | ७,८१,९२०/- | - | २००/- | ६ महिने | सु.बे.अ वर्ग ५ |
| ८) | घंटागाडी दुरुस्ती करणे. | ४०,०००/- | - | २००/- | ६ महिने | सु.बे.अ वर्ग ५ |
| ९) | घंटागाडी दुरुस्ती करणे. | ५०,०००/- | - | २००/- | ६ महिने | सु.बे.अ वर्ग ५ |

टीप: १) कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी दि.२५/११/२०२५ स. १०.०० पासून २) भरलेल्या निविदा स्वीकारण्याचा दि.०१/१२/२०२५ सायं ५.०० वा पर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय मोडनिंब ३) निविदा उघडणेचा दि.०२/१२/२०२५ रोजी स. १०.०० वाजता ४) निविदे संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ व २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळेल. ५) निविदा मंजूर,नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा निविदा रद्द करण्याचा अधिकार मा.सरपंच यांना राखुन ठेवला आहे.निविदा फॉर्म सुट्टीचे दिवस वगळून मिळतील व स्वीकारले जातील.

सही/- ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत
मोडनिंब,ता.माढा,जि.सोलापूर

शिक्का

सही/- सरपंच
ग्रामपंचायत मोडनिंब,
ता.माढा,जि.सोलापूर

# भाजपचे विकासाचे मुद्दे आणि डोके परिवाराची माणुसकीच विरोधकांना निष्प्रभ ठरवित कमळ फुलविणार

## प्रभाग क्रं. 9 मध्ये निवडणुकीच्या प्रचाराच्या दुसऱ्या टप्प्यात डोके परिवाराची निर्णायक मुसंडी

## सर्व-साधारण प्रवर्गाच्या उमेद्वार निलावती डोके यांच्या प्रचारार्थ भाच्चे देखील मैदानात

**मोहोळ (कटुसत्य वृत्त):-** मोहोळ शहराच्या दक्षिणेडील हद्दवाढ भागातील प्रभाग क्रं. 9 मधील प्रचारामध्ये भारतीय जनता पक्षाने निर्णायक आघाडी घेतली असून सर्व-साधारण प्रवर्गाच्या अधिकृत उमेदवार निलावती द्रोणाचार्य डोके यांच्या डोअर टू डोअर प्रचारामुळे वातावरण ढवळून निघाले आहे. या प्रभागाचा अविभाज्य घटक असलेल्या डोक वस्ती परिसरातील भाजपाच्या युवा कार्यकर्त्यांनी उमेदवार डोके यांचे सुपुत्र प्रवीण नाना डोके आणि प्रभाकर दादा डोके यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार प्रभागातील माहोलच बदलुन टाकला आहे. या प्रभागाचा दाट लोकसंख्येचा भाग असलेल्या समर्थ नगर, क्रांती नगर, फाटे नगर तसेच विष्वनाथ नगर यासह अनेक परिसरात डोके परिवाराचा सदस्य पोहोचला नाही असा कोणताच भाग राहिला नाही.

संपूर्ण प्रभागातील वाडया-वस्त्यादेखील महत्वाच्या असल्यामुळे प्रत्येक काना-कोपऱ्यात जाऊन भाजपची ध्येय धोरणे पोहोचवण्यामध्ये उमेदवार



निलावती डोके यांनी आघाडी घेतली आहे. या प्रभागातील विविध समस्या सोडविण्यासाठी भाजपाच वरिश्ठ स्तरावरून भरीव निधी आणू शकतो व स्थिर विकास देऊ शकतो ही बाब मनाला पटल्यामुळे ही निवडणुक पुर्णतः भाजपाच्याच पारडयात झुकल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे. डोके यांच्या प्रचारातील उत्साह आणि प्रतिसाद पाहून विरोधकांची पायाखालची वाळू सरकली आहे. त्यामुळे या प्रभागात आता परिवर्तन अटळ असून कमळ चिन्हावर डोके यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

निलावती डोके या नुकतेच शिवसेनेला जय महाराश्ट्र करत भाजपचे कमळ हाती धरलेल्या जेष्ठ नेते बाळासाहेब गायकवाड सख्ख्या भगिनी आहेत. त्यामुळे गायकवाड परिवार देखील पुर्ण ताकदीनीशी या प्रभागात उतरला आहे. गायकवाड परिवारातील युवा शिलेदार तथा मास्टरमाईड प्रचारक ठरलेले विक्रांत गायकवाड, वैभव दाजी गायकवाड या बंधुंनी अत्यंत शिस्तबध्द प्रचार यंत्रणा लावत सर्वपक्षीय विरोधकांना थक्क करून सोडले आहे. डोके परिवाराची जरी ही निवडणुक पहिली असली तरीदेखील माणुसकी आणि आपुलकीच्या जिव्हाळयामुळे डोके परिवाराची या प्रभागाची एंट्री आता दमदार ठरत आहे हे मात्र नक्की.

# प्रभाग क्र. 10 मधील शहरी भागाचा प्रचाराचा पहिला टप्पा पुर्ण झाल्यानंतर मेजर तानाजी माने यांनी वळविला पुन्हा वाडया-वस्त्यांकडे मोर्चा

## माजी आमदार राजन पाटील यांच्या विकासात्मक प्रभावाचा या निवडणुकीत मेजर माने यांना होणार फायदा

**मोहोळ (कटुसत्य वृत्त):-** भाजपाचा बालेकिल्ला असलेल्या प्रभाग क्रं. 10 मधील अधिकृत उमेदवार मेजर तानाजी माने शहर परिसरातील प्रचाराचा टप्पा पुर्ण झाल्यानंतर आता गाढवे वस्ती आणि माने वस्ती परिसरातील प्रचारावर पुन्हा बारकाईने लक्ष केंद्रीत केले आहे. सोमवार दि. 24 रोजी त्यांनी माने वस्ती, गाढवे वस्ती, वाघमोडे वस्ती, बरकडे वस्ती, कोकणे वस्ती, खरात वस्ती, चैगुले वस्ती, सलगर वस्ती, कोरबु वस्ती, गजघाटे वस्ती, पासले वस्ती आणि गडदे वस्ती या परिसरात प्रत्येक कुटुंबातील सदस्यांना प्रत्यक्ष भेटून पक्षाचा जाहिरनामा आणि उमेदवाराचा वचननामा लेखी स्वरूपात सुपुर्द केला.



मोहोळ शहर परिसरातील बाभुळगांव रोडलगत असलेल्या विविध क्षेत्रातील अनेक मान्यरांना भेटून मेजर तानाजी माने यांनी या निवडणुकीत भाजपाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहात मतदान करण्याचे आवाहन केले यावेळी त्यांच्यासमवेत डॉ. किरण माने, प्रशांत गाढवे, सुनिल गाढवे, श्रीकांत ढवण यांच्यासह प्रभाग क्र. 10 मधील भाजपाचे प्रचारयंत्रणेतील युवा शिलेदार उपस्थित होते.

भाजपचे जेष्ठ नेते राजन पाटील यांना मानणारा मोठा वर्ग प्रभाग क्रं. 10 मध्ये आहे. यापुर्वीच्या सत्ता कालावधील राजन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रभागाला भरीव निधी मिळू शकला आहे. या प्रभागत समावेशित असलेल्या जुन्या प्रभाग क्रं. 16 मध्ये नगरसेवक सुशिलभैय्या क्षिरसागर यांनी निरपेक्ष भावनेने राजकीय क्षेत्रात कार्यरत असताना केलेल्या विकास कामामुळे सुशिल क्षिरसागर यांच्याबद्दल या प्रभागाला आस्था आहे. त्यामुळे सुशिल क्षिरसागर परिवारातील सदस्यही या प्रचारामध्ये सक्रीय झाल्यामुळे त्याचाही फायदा मेजर तानाजी माने यांना होताना दिसत आहे.

# प्रभाग 20 च्या मतदार यादीत मोठा घोळ

## शेजारच्या चार प्रभागांचे हजारो मतदार 20 मध्ये; इच्छुक उमेदवारांमध्ये खळबळ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या तयारीला वेग आला असतानाच प्रभाग क्रमांक 20 च्या मतदारयादीत प्रचंड गोंधळ उडाल्याचे समोर आले आहे. महापालिकेने नुकतीच प्रसिद्ध केलेल्या यादीनुसार प्रभाग 20 ची लोकसंख्या 45,581 दाखवण्यात आली असून, यात पुरुष 22,667 आणि स्त्रिया 22,895 इतकी नोंद केली आहे. तथापि, ही संख्या वास्तव परिस्थितीपेक्षा मोठ्या प्रमाणात तफावत दाखवत असल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिक व इच्छुक उमेदवारांकडून करण्यात आला आहे.

**शेजारील प्रभागांचे 5-6 हजार मतदार 'उचलून' प्रभाग 20 मध्ये ?**

प्रभाग 20 च्या मतदारयादीचे बारकाईने निरीक्षण केले असता, प्रभाग 19, 21, 22 आणि 25 मधील जवळपास 5 ते 6 हजार



मतदार प्रभाग 20 मध्ये 'चुकून' हलवण्यात आल्याचे स्पष्ट झाल्याचा दावा करण्यात आला आहे. यामुळे संबंधित मतदारांसह आगामी निवडणुकीसाठी तयारीला लागलेल्या इच्छुक उमेदवारांमध्ये गोंधळ, नाराजी आणि संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मतदारयादीतील या मोठ्या त्रुटींवर तौफिक पैलवान शेख, नुरोदिन मुल्ला, इरफान शेख, अबूबकर सय्यद यांनी अधिकृत आक्षेप नोंदवला आहे.

याबाबत त्यांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल करून यादीतील गंभीर विसंगतींची तत्काळ दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे.

महानगरपालिकेने मतदारयादी जाहीर करण्यास सुरुवात केली असली, तरी अनेक प्रभागांमध्ये मतदार 'इधर-उधर' झाल्याने: मतदार स्वतःच्या नावाबाबत संभ्रमात, निवडणुकांसाठी रणनीती आखणारे इच्छुक उमेदवार अचंबित तर सामान्य नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे.

प्रभाग 20 ला शहरभरात विशेष राजकीय महत्व असल्याने या गोंधळाचे परिणाम आगामी निवडणुकीवर थेट दिसून येणार, असे स्थानिक पातळीवर सांगितले जात आहे.

तक्रारदारांनी मतदारयादीतील त्रुटींची तातडीने तपासणी करून दुरुस्ती न झाल्यास मोठे आंदोलन उभारण्याचा इशाराही दिला आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा याबाबतचा पुढील निर्णय आता सर्वांचे लक्ष वेधून घेणार आहे.

# मोहोळ शहराच्या पूर्व भागाच्या सर्वांगीण विकासाचे श्रेय मुस्ताक शेख यांनाच

## प्रभाग क्र. चार मध्ये त्यांच्या परिवारातील उमेदवारीमुळे मुस्ताकभाईंचे पूर्व भागातील पारडे जड

## विरोधाला विरोध करण्यापेक्षा प्रभागाला कोट्यावधीचा निधी आणून सर्वांगीण विकास साध्य केल्याने मोठा प्रतिसाद

**मोहोळ (साहिल शेख):-** मोहोळ शहराच्या पूर्वेकडील भागाच्या विकासात्मक वाटचालीचे यश भाजपचे ज्येष्ठ नेते माजी आमदार राजन पाटील यांच्या मार्गदर्शक नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या नगरसेवक मुस्ताकभाई शेख यांनाच जाते. आजवर प्रभागातून त्यांना अनेकांनी केवळ त्यांची राजकीय प्रतिभा आणि अजातशत्रुता पाहून विरोध केला. मात्र त्यांनी स्वतः कधीही कोणाला व्यक्तिशः विरोध केला नाही. द्वेषभावनेचे राजकारण न करता प्रत्येकाच्या अंतकरणात आपुलकी आणि जिव्हाळ्याने सामावण्याची किमया साध्य केलेल्या या माणुसकीच्या शिलेदाराचे राजकारण बऱ्याचदा संपवण्याचे प्रयत्नही झाले मात्र ते सर्वसामान्यांच्या आशीवार्दाने अपयशी ठरले.त्यांची काम करण्याची पद्धत आणि विरोधक असो अथवा पक्षातला प्रत्येकाला समान वागणूक देण्याची त्यांची



कार्यशैली त्यांना आजपर्यंतच्या राजकारणामध्ये यशस्वी बनवताना दिसून आली.

दहा वर्षापूर्वीचा त्यांचा प्रभाग आणि सध्याचा प्रगत आणि अत्याधुनिक सोयी सुविधांनी संपन्न असलेला प्रभाग यामध्ये अमुलाग्र बदल करण्याचे श्रेय त्यांनाच जाते. कारण त्यांनी ज्येष्ठ नेते राजन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली माजी आमदार यशवंत माने यांच्या सहकार्याने खेचून आणलेल्या निधीतूनच हे विकासाचे स्वप्न साकार होऊ शकले आहे. केवळ विरोध करून आणि टीकाटीपणी करून प्रभागाचा विकास साध्य करता येत नाही. त्यासाठी धडपड आणि हातोटी कायम ठेवावी लागते हे मुश्ताकभाई शेख यांच्या कार्यपद्धतीने तिथून प्रत्येक कार्यकर्त्याने शिकायला हवे.

प्रभागातील आरक्षण सोडतीनंतर त्यांनी निवडणुकीत उतरायचे की नाही याबाबत प्रभागातील सर्वसामान्यांची चर्चा केली. कोणताही प्रभागातील निर्णय प्रभागवासीयांना विचारूनच घेण्याची त्यांची स्वभावशैली त्यांना लोकप्रिय बनवत आली. आरक्षण सोडत झाल्यानंतर त्यांच्या परिवारातील सदस्यांनी ही निवडणूक लढवावीच आणि प्रभागातील विकास कामांची जबाबदारी मुश्ताकभाई यांनी यापुढेही अविरत स्वीकारावी असा सूर सर्वसामान्यातून आला. त्यानंतर त्यांनी पक्षश्रेष्ठींना भेटून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या सुविद्य पत्नी शाहिस्ता परवीन मुस्ताक शेख यांची उमेदवारी ही प्रभागातील सर्वसामान्यांचेच मनातून आल्यामुळे त्यांना या प्रचारा दरम्यान उमेदवारीच महत्व आणि कमळ पक्षचिन्ह मतदार बंधू-भगिनींना पटवून देताना फारशी अडचणी येताना दिसत नाही.

आजवरच्या मुस्ताक भाई शेख यांच्या वाटचालीत राजन पाटील हेच पक्ष आणि राजन मालकांचा विश्वास हेच पक्षचिन्ह या धोरणाने काम केल्यामुळे त्यांच्याकडे आणि ज्येष्ठ नेते राजन पाटील यांच्याकडे पाहून प्रभागातील जनतेने त्यांनाच विजयी करण्याचा दृढनिश्चय पक्का केला आहे. प्रभागात ठिकठिकाणी त्यांचे होत असलेले स्वागत पाहून मुस्ताकभाई शेख यांच्या सोबतच्या सर्व जिगरबाज कार्यकर्त्यांचे मनोबल आता मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहे.

# मुंबई उच्च न्यायालयाचे राज्य सरकारला कठोर आदेश

## निरंजन भूमकर यांच्या वैराग तालुक्याच्या लढ्याला गती

**वैराग (कटूसत्य वृत्त) :-** वैराग तालुका आणि अप्पर तहसील निर्मितीबाबत अनेक दशकांपासून सुरू असलेल्या संघषार्ला अखेर निर्णायक वळण मिळाले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाने राज्य शासन आणि सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांना मर्यादित वेळेत निर्णय घेण्याचे स्पष्ट आणि सक्तीचे आदेश दिले असून, या आदेशामुळे वैरागवासीयांच्या दीर्घ प्रतीक्षेला नवी आशा निर्माण झाली आहे. ही ऐतिहासिक बाब वैराग नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष निरंजन भूमकर यांनी दाखल केलेल्या रिट याचिकेमुळे शक्य झाली.

दरम्यानः बार्शीचे तहसीलदार, एसडीओ व निवासी जिल्हाधिकाऱ्यांनी वैराग तालुका निर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला. परंतु तांत्रिक त्रुट्यांच्या कारणावरून शासनाने प्रस्ताव परत पाठवला आणि त्या त्रुट्या दुरुस्त करण्यास २०११ ते २०२५ असा तब्बल १४ वर्षांचा कालावधी गेला. २८ जानेवारी २०२५ रोजी तहसीलदारांनी त्रुटी दुरुस्त केलेला फेरप्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केला. मात्र प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही न झाल्याने भूमकर यांनी न्यायालयाकडे धाव घेतली.

राजकीय आणि प्रशासकीय पातळीवरील हालचाली करत उपनगराध्यक्ष निरंजन भूमकर यांनी ८ ऑगस्ट २०२३ रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मागणीपत्र दिले होते. त्यानंतर पवार यांनी संबंधित विभागाच्या सचिवांना पुढील कार्यवाहीचे आदेश दिल्याची माहिती भूमकर यांनी दिली. या संपूर्ण न्यायालयीन प्रक्रियेत अॅड. मनीषा दळवी-काळोखे यांनी याचिका मांडणीचे काम पाहिले.

न्यायालयाने भूमकर यांच्या याचिकेत मांडलेल्या प्रमुख मुद्द्यांपैकी १. प्रस्ताव सहा वर्षापासून रखडलेला, वैराग ग्रामपंचायतीने सादर केलेल्या प्रस्तावावर राज्य शासनाने ना मंजूरी दिली, ना नकार. तो प्रलंबित ठेवून जनतेवर अन्याय केल्याचा मुद्दा ठळकपणे मांडला गेला. २. राज्यातील इतर ठिकाणी अप्पर तहसील मंजूर वैरागला का नाही? शासनाने याच काळात अनेक ठिकाणी अप्पर तहसील मंजूर केल्या, मात्र वैरागला सातत्याने डावलण्यामागील कारण काय? हा प्रश्न न्यायालयाने गंभीरतेने घेतला. ३. पंचक्रोशीतील जनतेची अत्यंत हालअपेष्टा वैरागच्या पंचक्रोशीत राहणाऱ्या हजारो नागरिकांना तहसील कार्यालयांपासून, शासकीय सेवांपासून, नोंदणी, प्रमाणपत्रे, महसूल कामे यांसाठी दूरवर जावे लागते. यामुळे होणारे आर्थिक-मानसिक नुकसान नकाशासह न्यायालयास दाखवण्यात आले. हे तीन मुख्य मुद्दे न्यायालयाने मान्य केले.

या आदेशांमुळे वैराग तालुका व अप्पर तहसील निर्मितीचा प्रश्न आता केवळ कागदावर नसून प्रत्यक्ष निर्णयाच्या उंबऱ्यावर येऊन पोहोचला आहे. आता राज्य शासन व जिल्हा प्रशासनाची भूमिका अत्यंत निर्णायक ठरणार आहे.

निरंजन भूमकर यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेला आरोग्य सभापती नागनाथ वाघ, नगरसेवक अजयकुमार काळोखे, अतुल मोहिते, संगमेश्वर डोळसे, सतीश सुरवसे, आनंद घोटकर, संजय झाडबुके, पिंटू लांडगे, अक्षय ताटे, खंडेराया घोडके, धनंजय स्वामी आदी मान्यवर उपस्थित होते.



### न्यायालयाचे आदेशः ठोस वेळापत्रक जाहीर

न्यायालयाने राज्य सरकार आणि जिल्हा प्रशासनाला पुढीलप्रमाणे आदेश दिलेः

१) अप्पर तहसील निर्मितीचा निर्णय - ३.५ महिन्यांत
२) वैराग तालुका निर्मितीचा निर्णय - ६ महिन्यांत
३) त्रुटी दुरुस्ती केलेल्या प्रस्तावाचा निपटारा - ४ महिन्यांत

निवासी जिल्हाधिकाऱ्यांना स्पष्टपणे निर्देश देण्यात आले आहेत की, प्रस्ताव आता प्रलंबित ठेवायचा नाही, तर निश्चित कालावधीत निर्णय घेऊन शासनाकडे अहवाल सादर करणे अनिवार्य आहे.

### सहा दशकांचा संघर्षः 1964 पासून 2025 पर्यंतचा प्रवास

वैराग तालुका निर्मिती ही एक-दोन दशकांची नव्हे, तर तब्बल ६० वर्षांची मागणी आहे. 1964 पासून स्व. धन्यकुमार भूमकर आणि स्व. माजी आमदार चंद्रकांत निंबाळकर त्यानंतर लढा जिंके पर्यंत निरंजन भूमकर या नेत्यांच्या नेतृत्वाखाली थेट आंदोलनांची मालिकाच उभी राहिली. ग्रामसभा ते मंत्रालय, तहसील ते विधानभवन प्रत्येक पातळीवर ठोसे देत हा प्रश्न जिवंत ठेवला गेला.

# मी पंढरपूरला जाणार अशा वावड्या विरोधक उठवितात - आ. अभिजीत पाटील

**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढा येथे विठ्ठल प्रतिष्ठान आयोजित कृषी व सांस्कृतिक महोत्सव २०२५ या कार्यक्रमात आनंद शिंदे, फोक प्रबोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात सत्काराच्या वेळी आमदार पाटील बोलत होते.

यावेळी ते पुढे म्हणाले, कृषी व सांस्कृतिक महोत्सवाचे हे दुसरे वर्ष आहे. यापुढे प्रत्येक वर्षी माढा या ठिकाणीच हा महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. गेल्या वर्षी विधानसभा निवडणुकीआधी हा महोत्सव साजरा करण्यात आला. त्याआधीच्या वर्षी तो पंढरपूर येथे साजरा करण्यात आला होता. यावेळी बोलत असताना गायक आनंद शिंदे




यांनी दरवर्षी हा महोत्सव भरवावा आणि तो माढा येथेच असावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

यानंतर आमदार पाटील म्हणाले, काहींनी आपल्याबाबत मी पंढरपूरला जाणार अशा वावड्या उठवायला सुरुवात केली आहे. पण माढा हीच माझी कर्मभूमी आहे आणि ती आयुष्यभर राहील. जे मला भीत आहेत, तेच मी पंढरपूरला जाण्याचा अपप्रचार करीत आहेत. पण त्यांना पुन्हा एकदा पाडल्याशिवाय मी राहणार नाही, असा निर्धार त्यांनी या वेळी व्यक्त केला.

फोक प्रबोधन कार्यक्रमात जुनी भारूड, ओव्या, हालगी, अशा पारंपरिक वाद्य व गाण्यांवर माढेकरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आनंद घेतला.

यावेळी माजी झेडपी सदस्य भारत शिंदे, राष्ट्रवादीचे माजी तालुकाध्यक्ष भाऊ महाडिक, माजी झेडपी सदस्य आनंदराव कानडे, ज्योती कुलकर्णी, विनंती कुलकर्णी भाऊसाहेब महाडिक, रावसाहेब देशमुख, बालाजी पाटील, नीलेश पाटील, आबा साठे, माजी सभापती विद्याताई शिंदे, माजी नगरसेवक शहाजी साठे, माजी पं. स. सदस्य दीपक देशमुख, बापूसाहेब जाधव, कुरण गिड्डे, संदीप खारे उपस्थित होते.

# नाशिक तपोवनातील वृक्षतोडीस संभाजी ब्रिगेडचा विरोध

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नाशिक येथे होणाऱ्या कुंभ मेळाव्यासाठी भारतातून वेगवेगळ्या भागातून मोठ्या प्रमाणात साधुसंत काही कालावधीसाठी येणार आहेत पण येणाऱ्या साधुसंतांच्या राहण्यासाठी त्यांच्या निवासस्थानासाठी काही कालावधीसाठी सरकारतर्फे निवासाची जी व्यवस्था करण्यात येणार आहे त्यासाठी नाशिक येथील तपोवनातील 1700 ते 1800 पूर्ण वाढ झालेली झाडांची तोड करण्यात येणार आहे हे योग्य आहे का एकीकडे सरकार झाडे लावा झाडे जगवा म्हणून जाहिरात करते आणि दुसरीकडे काही कालावधीसाठी येणाऱ्या साधू संतांसाठी निवासाची व्यवस्था करण्यासाठी इतिहासकालीन तपोवनातील नाशिकच्या भूमीतील झाडांची एवढ्या मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करते ज्या श्रीरामाच्या नावाने नाशिक येथील भूमी प्रसिद्ध आहे त्या भूमीत श्रीराम हे या तपोवनात राहुटी करून राहिले होते आणि ज्या श्रीरामाचे नाव घेऊन हे साधुसंत या नाशिकच्या भूमीत कुंभ मेळाव्यासाठी येणार आहेत त्यांच्यासाठी एसी व बांधलेल्या दगड मातीच्या निवासस्थानाची व्यवस्था हे काही आम्हास पटत नाही जर साधुसंतांना राहण्याची व्यवस्थाच करायची असेल तर ती तात्पुरत्या स्वरूपात राहुटी उभारून किंवा टेन्ट मारून ही करण्यात येऊ शकते त्यासाठी तपोणातील एवढ्या मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करण्याची



काहीही गरज नाही किंवा अनाटाही जनतेचा पैसा निवासस्थानासाठी खर्च करण्याची ही गरज नाही हा निवासस्थानाचा पैसा महाराष्ट्रातील अडीअडचणी सोडवण्यासाठी होऊ शकतो एकीकडे सरकार ओळीत दुष्काळाने ग्रासलेल्या महाराष्ट्रातील शेतकऱ्याला काडीमात्र मदत करते व अशा प्रकारे कुंभ मेळाव्याच्या नावाखाली हजारो कोटी खर्च करून अनाठही पैसा खर्च करते यात भ्रष्टाचारालाही भरपूर वाव आहे म्हणून जर आपण आज तपोवनातील झाडांची उंची व वयोमान बघितले तर यामध्ये कितीतरी कुंभमेळावे बघितलेली हेरिटेज झाडे आहेत व ती देशी स्वरूपातील वाणाची आहेत तपोवन म्हणजे जिथे साधुसंत बसून तप करू शकतात अशी वने म्हणजे तपोवन अशी झाडे जर आपण तोडले तर भारतीय संस्कृतीचा काय संदेश जगाला आपण देणार आपल्या किती तर पिढ्या हे झाडे लावण्यासाठी जातील आणि या तपोवनातील वनात किती तर साधुसंतांनी आपली तपश्चर्या या अगोदर पूर्ण केली असेल असे तपोवन नष्ट करणे हे पर्यावरणाच्या दृष्टीने हानिकारक आहे वृक्ष हे आपल्या सृष्टीतील एक महत्वाच घटक आहेत. वाढत्या शहरीकरण आणि औद्योगिकीकरणाने बेसुमार वृक्षतोड झाली आहे. सरकारच वृक्षलागवड योजना पुर्ण फसली आहे.

यातच नाशिक येथील कुंभ मेळ्यातील काही दिवसाच्या निवासस्थानासाठी 1800 पुर्ण वाढ झालेली झाड तोडण्यास आमचा तीव्र विरोध आहे. 1800 नष्ट होणे म्हणजे यावर अवलंबून असलेल्या हजारो लाखो कीटक जंतू प्राणी त्याचबरोबर ऑक्सिजन याचीही मोठी हानी होणार आहे आणि सरकार एक झाडाला झाडे लावणार ही जी घोषणा केलेली आहे यात सरकारनेच सांगावे की अशी झाडे येण्यासाठी किती वषार्चा कालावधी लागू शकतो आणि ही सर्व झाडे जगू शकतात का म्हणून आम्ही संभाजी ब्रिगेड तर्फे जन आंदोलन महाराष्ट्रात उभे करून या विरोधात नाशिक येथील तपोवनात येवून झाड वाचवण्यासाठी आम्ही आमचे बलिदान देवू एवढा मोठ्या प्रमाणात वृक्षांची तोड करून पर्यावरणाचे हानी करून जर सरकार निवासस्थाने बांधत असतील तर त्यास संभाजी ब्रिगेड सडेतोड उत्तर देणार व नाशिकच्या ऐतिहासिक तपोवनातील वृक्षतोड करण्यास पूर्णपणे विरोध करणार व रस्त्यावर उतरून संभाजी ब्रिगेड त्यावर प्रत्युत्तर देणार या सर्वस्वी सरकार जबाबदार असेल म्हणून आम्ही मुख्यमंत्री वनमंत्री पर्यावरण खात्यास व आपणास या निवेदनाद्वारे विनंती करतो की नाशिक येथे होणाऱ्या कुंभ मेळाव्यासाठी तपोवनातील कुठल्याही वृक्षाची तोड होणार नाही याची काळजी सरकारने घ्यावी व यावर पर्यायी मार्ग काढावा याप्रसंगी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले महानगर प्रमुख शिरीष भैया जगदाळे महिला आघाडी जिल्हाध्यक्ष मीनलदास शहराध्यक्ष मनीषा कोळी वकील आघाडीचे जिल्हाध्यक्ष ड गणेश कदम जिल्हा कार्याध्यक्ष शेखर भोसले शहर व जिल्हा सचिव सिद्धाराम सावळे शहर कार्याध्यक्ष सतीश वावरे, राजेंद्र माने जिल्हा सचिव, दिलीप निंबाळकर जिल्हा कार्याध्यक्ष, जयश्री जाधव जिल्हा उपाध्यक्ष, माधुरी चव्हाण शहर उपाध्यक्ष संतोष सुरवसे दिलीप भोसले व इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.